बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे


आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ०४ | बुधवार,दि.०४ जानेवारी २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


# मृत व्यक्तीच्या करारनाम्यातील स्वाक्षरीत फेरबद्दल करुन काढले बिल


क्र.जिपगो/साबांवि/निविदा/डे-५/वशि/ ७८३ /२२
कार्यालय:-जिल्हा परिषद, गोंदिया
(सार्वजनिक बांधकाम विभाग)
दिनांक :- ४/३/२०२२

प्रति,
मे. पी.ए.बग्गा कॉन्ट्रॅक्टर एण्ड सप्लायर,
गोंदिया

विषय:- प्रा.आरोग्य उपकेंद्र भरनोली येथे उपकेंद्रा च्या नविन इमारती मध्ये विद्युतीकरण करणे, या कामाच्या निविदा किंमतीच्या दरासाठी वाटाघाटी करण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत. १३
संदर्भ:- निविदा सुचना क्र.०४ (सन २०२१-२२) खुला प्रवर्ग मध्ये सादर केलेली निविदा उघडल्याचा दि.४/३/२०२२.

उपरोक्त विषयांकित पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील कामाची आपली निविदा दिनांक ४/३/२०२२ रोजी उघडण्यात आली असता आपण भरलेली निविदा अनुसुची-ब ची एकूण रक्कम रुपये ७१५३८०/- (भाग-१) चे किमती पेक्षा ०.११ टक्के कमी दराने रुपये ७१४५९३/- ची निविदा सादर केली आहे. आपली निविदा समितीला मंजूर नसल्यामुळे सदरील कामाचे दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया यांचे कार्यालयात आजच दिनांक ४/३/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता लेखी खुलाशासह समक्ष उपस्थित राहावे.

कार्यकारी अभियंता,
जि.प.सा.बा.विभाग,गोंदिया

प्रतिलिपी:- मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया यांना माहितीस्तव सादर.

कार्यकारी अभियंता
जि.प.सा.बा.विभाग,गोंदिया


पत्र एकच तडजोडीचे मात्र दोन्ही पत्रावर स्वाक्षरीत फरक, मग खरे पत्र कुठले.

**गोंदिया–**गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातंर्गत सुमारे ८ लाख रुपये किमतीचे ९ काम बग्गा यांच्या फर्मला मिळाले होते.त्यामध्ये भरनोली,उपकेंद्र खोबा,मेंढा,उपकेंद्र खेडेपार,डोंगरगाव डेपो,धापेवाडा,झाशीनगर,करटी बु. येथील कामकारीता निविदा मंजुर झालेली होती.या कामासाठी पी.ए.बग्गा यांनी जो करारनामा केला होता,त्या करारनाम्यालाच बदलवण्यात आल्याचे कागदपत्रावरुन दिसून येत आहे.त्यामुळे शासकीय कागदपत्रांची हेराफेरी करण्यात आल्याचे स्पष्ट झाले असून हा मोठा गुन्हा या प्रकरणात घडून आलेला आहे.त्यामुळे या प्रकरणात सखोल चौकशीची गरज निर्माण झाली असून मुख्य कार्यकारी अधिकारी याकडे किती लक्ष देतात हे बघावयाचे आहे.

यातच भरनोली येथील ७ लाख १५ हजार रुपयाच्या कामाची निविदा पी.ए.बग्गा कॉन्ट्रक्टर एण्ड सप्लायर यांनी सादर केली होती.ती निविदा ०.११ टक्के कमी दराने सादर केल्याने बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी ४ मार्च २०२२ रोजी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कक्षात तडजोड करण्यासाठी बोल–ावले होते.विशेष म्हणजे या फर्मचे संचालक प्रितपालसिंग अमोलकसिंग बग्गा यांचा मृत्यू १९ फेबुवारी २०२१ रोजी झाल्याने त्याची नोंद ३ मार्च २०२१ रोजी नगरपरिषद गोंदिया येथे करण्यात आली असून त्यासंदर्भातील मृत्यू प्रमाणपत्र १७ ऑगस्ट २०२२ रोजी जारी करण्यात आले आहे.जर सदर व्यक्ती मार्च २०२१ मध्ये मृत्यू झाला असेल तर मार्च २२ मध्ये त्यांच्या नावावर हजर राहिलेली व्यक्ती कोण हा प्रश्न उपस्थित झाला असून शासनाची फसवणूक करीत स्वाक्षरीमध्ये हेरफार करण्यात आल्याचे दिसन येत आहे.

सोबतच सबंधित शासकीय विभागाला फर्मचे संचालक मृत्यू झाल्याचे का कळविण्यात आले नाही आणि तडजोडीकरीता उपस्थित राहण्याकरीता कोण हजर राहिले.पी.ए.बग्गा यांच्या पंजीयन करारनाम्यातील स्वाक्षरी व तडजोड पत्रातील स्वाक्षरीमध्ये तफावत दिसून येत आहे.आधीच्या पत्रात पीएबग्गा अशी स्वाक्षरी असून नंतर मात्र एसपीएबग्गा अशी करण्यात आल्याचे दिसन येत आहे. त्यातच जीएसटी रद्द झालेली असताना १२ टक्के जीएसटीची रक्कम बांधकाम विभागाची रक्कम कशी वसुल करण्यात आली असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहे.

पी.ए.बग्गा यांनी जि.प.बांधकाम विभागाकडे केलेल्या पंजीयन आदेशा–तील स्वाक्षरीमध्येही फरक दिसून येत आहे.तर यांचे जीएसटी नंबर सुध्दा १९ फेबुवारी २०२१ला चा रद्द झाल्याचे सम ोर आले आहे.त्यानंतरही त्या व्यक्तीच्या मृत्यूची माहिती अधिकृतरित्या जिल्हा परिषद बांधकाम विभाग व खउखखउख बँकेला न देता काम पूर्ण करण्यात आले.आणि त्या कामापोटी मिळालेले सुमारे ७० लाख रुपये हे मृत व्यक्तीच्या खात्यात जमा करण्यात आले.मात्र सदर ICICI बँकेनेही सदर व्यक्तीचा मृत्यू २०२१ मध्येच झालेला असताना २०२२ मध्ये कुठल्या निर्णयाद्वारे रक्कम विड्राल करण्यास परवानगी दिली.हा प्रश्न उपस्थित झाला आहे.विशेष म्हणजे एखादा व्यक्ती मृत झाल्यानंतर त्यांनी कितीही धनादेशावर स्वाक्षरी आधीच करुन ठेवले असले तरी ते मृत्यूनंतर ग्राह्य धरले जात नसल्याचे नियम आहे.


Government of India
Form GST REG-06
Registration Certificate
Registration Number : 27AJWPB0837B1ZE


| | | |
|---|---|---|
| 1 | Legal Name | PRITPAL SINGH AMOLAK SINGH BAGGA |
| 2 | Trade Name, if any | P. A. BAGGA |
| 3 | Constitution of Business | Proprietorship |
| 4 | Address of Principal Place of Business | VARDHMAN MAHAVIR WARD, 11/240, NEAR DR KOLTE, GANESH NAGAR, GONDIA, Gondia, Maharashtra, 441601 |
| 5 | Date of Liability | |
| 6 | Period of Validity | From 14/10/2019 To Not Applicable |
| 7 | Type of Registration | Regular |
| 8 | Particulars of Approving Authority | Maharashtra |

| | |
|---|---|
| Name | SHEELA HARIDAS MESHRAM |
| Designation | Deputy Commissioner |
| Jurisdictional Office | GONDIA_501 |
| Date of issue of Certificate | 14/10/2019 |

Note: The registration certificate is required to be prominently displayed at all places of business in the State.

This is a system generated digitally signed Registration Certificate issued based on the approval of application granted on 14/10/2019 by the jurisdictional authority.

सत्यप्रत


Goods and Services Tax
Search Result based on GSTIN/UIN : 27AJWPB0837B1ZE
Legal Name of Business
PRITPAL SINGH AMOLAK SINGH BAGGA
Trade Name
P. A. BAGGA
Effective Date of registration
14/10/2019
Constitution of Business
Proprietorship
GSTIN / UIN Status
Cancelled on application of Taxpayer
(Effective from 19/02/2021)
Taxpayer Type
Regular

## वीज कर्मचारी बुधवारपासून संपावर

**नागपूर:–**अदानी इलेक्ट्रिकल या कंपनीने महाराष्ट्र सरकारच्या अधिकार क्षेत्रातील वीज कंपनीला समांतर नवीन लायसंसी स्थापित करून वीज ग्राहकांचे क्षेत्र महावितरण कंपनीऐवजी अदानी इलेक्ट्रिकल कंपनीला हस्तांतरित व्हावा म्हणून महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे अर्ज करून तसा परवाना मागितला आहे. खासगी कॉर्पोरेट घराण्याने (अदानी) पूर्णतः औद्योगिक विकास झालेल्या व भविष्यात होणाऱ्या विभागावर जास्तीत जास्त नफा कमावण्याच्या उद्देशाने समांतर लायसन्सीची मान्यता मिळावी म्हणून अर्ज केला. या परवान्याला वीज कर्मचारी संघर्ष समितीने विरोध केला असून, येत्या बुधवारपासून अधिकारी, कर्मचारी संपावर जाणार आहे.




महावितरण ही आशिया खंडातील सर्वात मोठी व कार्यक्षम ठरलेली कंपनी असून, केंद्र सरकारने कंपनीच्या एकूण कार्यक्षमता व कारभाराचे परीक्षण करून या कंपनीला अनेक पारितोषिके बहाल केली आहेत. ज्या कंपनीने २०२१–२२ या वर्षात १३५ कोटी रुपयांचा नफा कमाविला अशा कंपनीच्या महसुलाचा उच्चांक असलेला व ज्या ठिकाणी कृषी ग्राहकच नाही, असा प्रदेश खासगीकरणाकरिता निवडला आहे. या कृतीला संघर्ष समितीमधील सर्व संघटनांचा तीव्र विरोध आहे. महावितरण कंपनी मिळवत असलेला नफा राज्यांच्या हिताकरिता, विकासाकरिता वापरला जा–तो तर अदानी वीज ग्राहक व जनतेची सेवा करण्याकरिता नव्हे तर जास्तीत जास्त नफा कमविण्याच्या उद्देशाने व तो नफा व्यक्तिगत लाटण्याच्या उद्देशाने या क्षेत्रात येत आहे. या पद्धतीने खासगीकरण झाले तर शासन व महावितरण कृषी व घरगुती वीज ग्राहकांना स्वस्त दरांत वीज देतो ती क्रॉस सबसिडी अदानीच्या भागातील शून्य झाल्यामुळे त्याचा वीजद–रावर परिणाम होऊन विजेचे दर वाढतील व क्रास सबसिडी बंद झाल्याने घरगुती ग्राहक, दुर्बल घटकांना स्वस्त दरात वीज देणे अशक्य होणार आहे. शासनाच्या या खासगीकरण धोरणाचा विरोध करण्याकरिता वीज उद्योगा–तील ३० संघटनांचे ८६ हजार कर्मचारी, अधिकारी, अभियंते हे ४ ते ६ जानेवारीपर्यंत संपावर जाणार आहे. नागपूर ग्रामीण व नागपूर शहर भागातील वितरण, पारेषण कंपनीतील सर्व कर्मचारी, अधिकारी, अभियंते हे संविधान चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाजवळ जमा होऊन आंदोलन करतील.

## तस्करीसाठी जाणाऱ्या १४० जनावरांची सुटका,सालेकसा पोलिसांची कारवाई

**सालेकसा,दि.०३:–** पोलीस ठाणेंतर्गत येत असलेल्या हद्दीतून ०२ जानेवारी २०२३च्या रोजी मध्यरात्री सीमावती,नक्षलग्रस्त जंगल भागाचा फायदा घेऊन मध्य प्रदेश व छत्तीसगड राज्यातून कत्तलीकरिता नेण्याकरीता जनावरे पानगाव व कहाली गावाच्या मध्ये असणाऱ्या निर्मनुष्य जंगल परिसरात ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली.त्या माहितीच्या आधारे सालेकसा पोलिसांच्या पथकाकने धाड घातली असता ८–१० गुप मध्ये १०–१५ ठिकाणी गौवंशाची जनावरे कोणतीही चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने बांधून ठेवण्यात आल्याचे दिसून आले.ठाणेदार जनार्दन हेगडकर यांनी २ जानेवारीच्या रात्री १२.३० वा.पासून ०३ जानेवारीच्या सकाळी ०९.०० वा.पर्यत घटनास्थळ परिसरात शोध मोहीम राबवून वेगवेगळ्या ठिकाणी धाडी घालून बांधलेली १४० गौवंशाची जनावरांची सुटका केली.जनावराना चारा–पाण्याची व्यवस्था करण्यासाठी व सांभाळण्यासाठी गौशाळेत जमा करण्यात आली असून सालेकसा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.सदर कारवाईमुळे परिसरातून पोलिसांचे कौतूक होत आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, यांचे आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक अश–ोक बनकर व उपविभागीय पोलीस अधिकारी आमगाव विजय भिसे यांचे मार्गदर्शनात सालेकसा पोलीस ठाण्याचे ठाणेदार जनार्दन हेगडकर यांचे नेतृत्वात पो.उप.नि.मुंडे, स.फौ.चौबे, ना.पो.शी निमजे ,अग्निहोत्री,अजय इंगळे, सुजित बनसोड व इतर कर्मचारी यांनी केलेली आहे.



## पालकमंत्री मुनगंटीवारांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन



**नागपूर–** गोंदिया येथून प्रकाशित बेरार टाईम्स वृत्तपत्र व न्युजपोर्टलच्या २०२३ वर्षाच्या कॅलेंडरचे प्रकाशन राज्याचे वनमंत्री व गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार,तिरोडा–गोरेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयभाऊ रहागंडाले,संपादक खेमेंद्र कटरे यांच्या हस्ते विधानभवनात करण्यात आले.यावेळी ओबीसी युवा अधिकार मंचचे सयोंजक उमेश कोर्राम,अतुल गजभिये,निरज सोनवणे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.



गोंदियाचे नवनियुक्त जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे दिनदर्शिका स्विकारतांना.

## उपसरपंच निवडीत सरपंचाला मत देण्याचा अधिकार

### दुसरे मत समान मते पडल्यावर सरपंच देणार, ईश्वरचिठ्टीद्वारे होणारी निवड रद्द

गोंदिया :–राज्यात नुकत्याच ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या.त्यात सरपंचाची थेट जनतेतून निवड झाल्यानंतर आता उपसरपंच निवडी महत्त्वाच्या मानल्या जात आहे. उपसरपंच निवडीत लोकनियुक्त सरपंचाला मत देण्याचा अधिकार देण्यात आल्याने गोंदिया जिल्ह्यात या निर्णयाच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.विशेष म्हणजे तक्रारकर्ते पुष्पराज जनबंधु माजी प.स.सदस्य, प्रदिप शहारे काँग्रेस स्वयरोजगार विभाग जिल्हाध्यक्ष, नंदकिशोर तुपट ग्रा.प.सदस्य व सामाजिक कार्यकर्ता कृष्णहरी वंजारी यांनी सरपंच हे जनतेतून निवडून आले असून ते ग्रामपंचायत कायद्यानुसार सदस्यही नाहीत.ते सदस्य नसल्याने त्यांना सदस्य म्हणून मतदानाचा अधिकार देता येत नसल्याचे म्हटले आहे. ३०/०९/२०२२ चे ग्रामविकास विभागाचे कक्ष अधिकारी सुनिल माळी यांच्या पत्राचा आधार घेत सरपंचाला दोन मतदानाचा निर्णय घेण्यात आलेला आहे.मात्र त्या पत्रात स्पष्टता नसल्याने या पध्दतीच्या उपसरपंच निवड प्रकियेवर आक्षेप नोंदवला आहे शासनाचे यांसदर्भात शासन निर्णय व किंवा राज्यपालांच्या स्वाक्षरीचे अध्यादेश सुध्दा नसल्याचे म्हटले.जर उपसरंपचाच्या निवडणुकीत समान मते पडली त्यावेळी सरपंचाला मतदान करण्याचा अधिकार हवे असे म्हटले आहे.

जनतेतून निवडून आलेल्या सरपंचाला सदस्य म्हणून शिवाय उपसरपंच निवड करताना दोन्ही बाजूने समान मते पडली तर त्याबाबत निर्णायक मत देण्याचा अधिकारही सरपंचाला दिला आहे. ग्रामविकास विभागाने याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून कळविले आहे. शिव–सेना–भाजप युतीचे सरकार असताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरपंच पदाची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय घेतला. मात्र २०१९ नंतर सत्ता परिवर्तन झाल्यावर शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेसची सत्ता आली. त्यांनी तातडीने थेट सरपंच जनतेतून निवडीचा निर्णय रद्द केला. आता पुन्हा सात महिन्यांपूर्वी नव्याने एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले. पुन्हा सरपंच पद निवडीच्या निर्णयात बदल करून सरपंच पदाची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय घेतला. आक्टोबर ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपलेल्या राज्यातील पावणे आठ हजार ग्रामपंचायतीच्या निवडणूका झाल्या. शिंदे–फडणवीस सरकारच्या निर्णयानंतर सर्व पावणे आठ हजार सरपंचांची निवड थेट जनतेतून झाली.

ग्रामपंचायतीत सदस्य संख्या विषम असल्याने व सदस्यांतून सरपंच, उपसरपंच निवड एकाच वेळी होत असल्याने अडचणी येत नव्हत्या. मात्र आता सदस्य संख्या पूर्वीप्रमाणेच आहे. मात्र थेट सरपंच लोकांनी निवडला. लोकांनी निवडलेला सरपंचही सभागृहाचा सदस्य आहे. यापूर्वी ज्यावेळी थेट सरपंच जनतेतून निवडले गेले, त्यावेळी सरपंचाला उपसरपंच निवडीवेळी मतदान करण्याचा अधिकार आहे का, हा प्रश्न निर्माण झाला होता.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ३३ नुसार सरपंच व उपसरपंचांच्या निवडीची ग्रामविकास विभागाने कार्यपद्धती स्पष्ट करत जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविले आहे. उपसरपंचाची निवड ही लोकनियुक्त सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होईल. उपसरपंच निवडीत लोकनियुक्त सरपंचाला आपल्या इच्छेनुसार मतदान देता येईल. सरपंचाने मत दिल्यानंतर दोन्ही बाजूची मते सम–समान झाली. तर सरपंचाला पुन्हा निर्णायक मत देण्याचा हक्क राहील असे म्हटले आहे.



### ..तर जिल्हाधिकारी करणार खातरजमा

**ग्रामपंचायतीच्या नूतन पदाधिकाऱ्यांची वेळेत निवड करणे गरजेचे आहे. उपसरपंच निवडणुकीची सभा काही कारणाने तहकूब झाली तर लगेच तातडीने दुस?या दिवशी सभा घ्यावी. एखाद्या ठिकाणी उपसरपंच निवडीत सरपंच सभेला काही कारणाने हजर राहू शकत नसल्यास त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी त्या कारणांची खातरजमा करून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ३३ मधील पोट कलम ६ (४) मधील तरतुदीनुसार पीठासीन अधिकारी नियुक्त करून उपसरपंच निवडला जाईल.**

### ईश्वरचिठ्टी ऐवजी सरपंच करणार मतदान

**उपसरपंच पदाच्या निवडणुकीच्यावेळी सरपंच आपले मतदान तर करणारच,पण त्यानंतरही जेव्हा दोन्ही उमेदवारांना समसमान मते मिळतील,त्यावेळी आधी ईश्वरचिठ्ठीव्दारे जी निवड व्हायची पध्दत होती,ती शासनाने रद्द करुन समानमते जिथे पडतील अशा ठिकाणी पुन्हा सरपंचाला मतदान करुन उपसरपंचाच्या निवडीचे अधिकार दिलेले आहेत. सुनिल माळी यांच्या पत्रामध्ये संभ्रम आहे.मात्र गोंदिया जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या पत्रात स्पष्टता असल्याने सरपंच प्रत्येकवेळी दोन मतदान करणार नाही.तर फक्त ज्याठिकाणी समान मते पडतील तिथेच मतदान दुसऱ्यांदा करतील अशी माहिती सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक लखनसिंह कटरे यांनी दिली.**

> **सरपंचाना दोन मतदानाचा दिलेला अधिकार हा योग्य नाही.सरपंच सरळ निवडून आलेले आहेत,त्यातच त्यांना सदस्य म्हणून लोकांनी निवडून दिलेले नाही,त्यामुळे यावर विचार होणे आवश्यक आहे.**
> **सुरेश हर्षे,जिल्हा परिषद सदस्य गोंदिया**

## शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर

**गोंदिया :** भारत निवडणूक आयोगाचे दिनांक २९ डिसेंबर २०२२ रोजीचे प्रसिध्द पत्रकान्वये नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाच्या द्विवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. सदर द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम नुसार दिनांक ५ जानेवारी २०२३ रोजी निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्दी, दिनांक १२ जानेवारी २०२३ रोजी नामनिर्देशन पत्रे सादर करणे, दिनांक १६ जानेवारी २०२३ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्यात येणार, दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजी मतदान व दिनांक २ फेब्रुवारी २०२३ रोजी मतमोजणी होणार आहे.

त्याचप्रमाणे दिनांक १ नोव्हेंबर २०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत नागपूर विभागातील शिक्षक मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या (de-novo) पुनरिक्षण कार्यक्रम दिनांक ३० डिसेंबर २०२२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्दी करण्यात आली असून गोंदिया जिल्ह्या–तील १० मतदान केंद्रावर २६५७ पुरुष व १२१७ स्त्रिया असे एकूण ३८७४ शिक्षकांची मतदार यादीत मतदार म्हणून नोंद करण्यात आली आहे. असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी चिन्मय गोतमारे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## धापेवाडातील पाणी करडी क्षेत्राला सिंचनासाठी उपलब्ध करा

### लोकप्रतिनिधींकडे शेतकऱ्यांची मागणी :धापेवाडा टप्पा-२ पूर्णत्वाच्या प्रतीक्षेत



**मोहाडी :** तालुक्यातील करडी परिसरातील देव्हाडा, निलज बु., नवेगाव, मोहगाव कोरडवाहू क्षेत्रात मोडतो. सिंचनाच्या फारशा सुविधा या भागात नाहीत. धापेवाडा टप्पा–२ पूर्णत्वाच्या प्रतीक्षेत आहे. या प्रकल्पाचे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधींनी यासाठी शासनदरबारी समस्या उचलून धरावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

तत्कालीन सर्वच सत्ताप–क्षातील स्थानिक नेत्यांनी शेतकऱ्यांना धापेवाडा टप्पा २ चे पाणी उपलब्ध करण्याचे लॉलीपॉप दाखविले होते. परंतु आता हेच लोकप्रतिनिधी मूग गिळून आहेत. सुरेवाडा उपसा सिंचन प्रकल्पाच्या सुधारित प्रस्ता–वास मंजुरी मिळाल्याने वंचित गावातील शेतकऱ्यांत धापेवाडा योजनेचे पाणी उपलब्ध व्हावे, अशी अपेक्षा आहे. 'सुरेवाडा नाही तर धापेवाडा सही' असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

गोंदिया जिल्ह्यातील धापेवाडा उपसा सिंचन योजनेचा टप्पा –१ पूर्ण झाला आहे. टप्पा क्रमांक २ चे जलपूजन १ मार्च २०१४ रोजी करण्यात आले. तेव्हापासून प्रकल्पाची कामे सुरू आहेत. या सिंचन योजनेचे पाणी मोठ्या पाईपच्या माध्यमातून चोरखमारा, बोदलकसा तलावात सोडण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती आहे. दुसऱ्या टप्प्यात भंडारा जिल्ह्यातील मोहाडी, साकोली या तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. तिरोडा तालुक्यातील चोरखमारा तलावात धरणातील पाणी सोडल्यानंतर कालव्यांतून थेट करडी क्षेत्रातील निलज बूज, जांभळापाणी, देव्हाडा बूज, नरसिंहटोला, देव्हाडा खुर्द, निलज खुर्द, मोहगाव, नवेगाव परिसरातील मालग–ुजारी तलावांमध्ये सोडता येते. या योजनेमुळे मोहाडी तालुक्यातील गावांना फायदा मिळणे शक्य होईल. त्यामुळे महत्त्वाकांक्षी प्रकल्प शक्य तेवढ्या लवकर होणे गरजेचे आहे.

**वैनगंगेमुळे करडी परिसराचे नुकसान**

वैनगंगा नदीमुळे मोहाडी तालुका दोन भागात विभाजीत आहे, करडी परिस– रातील गावे नदीकाठी असतांना पाण्याचा प्रत्यक्षात शेतीसाठी उपयोग होत नाही. सुरेवाडा योजना करडीच्या उत्तरेला असलेल्या निलज खुर्दपर्यंत प्रस्तावित आहे. परंतु, मोहगाव नाल्यामुळे योजनेचे पाणी निलज बुज, निलज खुर्दचा उर्वरित क्षेत्र, मोहगाव, नवेगाव, देव्हाडा बुज पर्यंत पोहोचविणे शक्य नाही. अशावेळी धापेवाडा उपसा सिंचन योजना वरदान ठरणारी आहे.

**सुरेवाडा प्रकल्पामुळे वाढल्या अपेक्षा**

ऑक्टोबर महिन्यात तीन वर्षांपासून प्रलंबित सुरेवाडा उपसा सिंचन प्रकल्पाच्या ३३६ कोटी २२ लाख इतक्या सुधारित प्रस्तावास मान्यता मिळाली. या प्रकल्पामुळे भंडारा तालुक्यातील सात, मोहाडी तालुक्यातील २० व गोंदिया जिल्ह्यातील एका गा–वाला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. मात्र, करडी जिल्हा परिषद क्षेत्रातील अनेक गावांना या योजनेतून वगळण्यात आले.

यासाठी जुन्या सिंचन व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये धापेवाडा प्रकल्पासंबंधीच्या अपे–क्षा वाढल्या आहेत. धापेवाडाचे पाणी करडी परिसराला उपलब्ध झाल्यास सिंचनाची समस्या दूर होवून शेती सुजलाम–सुफलाम होण्यास मदत होईल.

**गोंदिया जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी संस्था मर्या. गोंदिया र.नं.१०२**

## विशेष आमसभेचे नोटीस

गोंदिया जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या.गोंदिया र.नं.१०२ या संस्थेची विशेष सभा (आमसभा) दिनांक ०८/०१/२०२३ ला रोज रविवारी दुपारी १२.०० वाजता **"मयुर लॉन्स, कटंगी कला ता.जि.गोंदिया'** येथे घेण्यात येणार आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सदर सभेस नियोजित वेळी व स्थळी कृपया उपस्थित राहावे ही विनंती.

दिनांक :–०२/०१/२०२३

**टिप:–**

१. गणपुर्ती (कोरम) च्या अभावी तहकुब केलेली सभा एक तासानंतर निर्धारित केलेल्या ठिकाणी त्याच दिवशी, त्याच विषयावर घेण्यात येईल. तहकुब सभेस कोरमची आवश्यकता भासणार नाही.
२. सभेत येतांना कृपया सभेची विषय सुची सोबत आणावी.
३. ज्या सभासदांना विशेष आमसभेची नोटीस, पत्याअभावी प्राप्त झालेली नसेल त्या सभासदांनी हिच नोटीस समजून आमसभेत उपस्थित राहावे ही विनंती.
४. सभासदांना विशेष सभा (आमसभा) बैठक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

व्यवस्थापक समितीच्यावतीने
**(कमलेश बिसेन)**
सचिव
गोंदिया जि.प.व पं.स.कर्म.
सह. संस्था, मर्या. गोंदिया र.नं.१०२

## संपादकीय

### नोटाबंदीचा निर्णय, सरकारला दिलासा

केंद्र सरकारने घेतलेला नोटाबंदीचा निर्णय योग्य असल्याचा निर्वाळा सवीच्च न्यायालयाने दिल्यामुळे मोदी सरकारने देशावर नोटाबंदी लादली, असा प्रचार करणारे विरोधी पक्ष तोंडावर आपटले आहेत. सवीच्च न्यायालयाच्या पाच जणांच्या खंडपीठाने नोटाबंदी संदर्भात निर्णय देताना सरकारने काहीही चुकीचे केले नाही, असे निकालात स्पष्ट म्हटले आहे. पाचशे व एक हजाराच्या नोटा रद्द ठरवताना सरकारने कोणताही गडबड घोटाळा केलेला नाही, असेही निकालात न्यायालयाने स्पष्ट म्हटल्याने ,केंद्र सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारने घेतलेला आर्थिक निर्णय बदलता येणार नाही. सवीच्च न्यायालयाच्या खंडपीठाने चार विरूद्ध एक अशा बहुमताने हा निकाल दिला आहे. नोटाबंदीचा निर्णय घेण्याअगोदर सरकार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्यात चर्चा झाली होती, त्यामुळे सर्व देशावर परिणाम करणारा निर्णय सरकारने मनमानी पध्दतीने घेतला असे म्हणता येणार नाही, असे खंडपीठाने म्हटले आहे.

सरकारच्या निर्णयाशी न्या. व्ही. रामसुब्रम्हण्यम, न्या. बी. आर. गवई,. न्या. अब्दुल नजीर व न्या. ए. एस. बोपण्णा यांनी सहमती दर्शवली आहे. मात्र न्या. बीबी नागरत्न यांनी सरकारचा निर्णय ,बेकायदेशीर होता असे नमूद केले आहे. अधिसुचना काढून निर्णय जारी करण्याऐवजी कायद्याच्या माध्यमातून तसा निर्णय घ्यायला पाहिजे होता, असे न्या. बी बी नागरत्न यांनी म्हटले आहे. न्या. गवई यांनी निकालात म्हटले आहे की, नोटाबंदीच्या निर्णय प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित करता येणार नाही, कारण सरकार व रिझर्व्ह बँक यांच्या या मुद्दयावर अगोदर चर्चा झालेली होती.

या चर्चेनंतरच सरकारने हा निर्णय घेतला आहे. नोटाबंदी करण्याम ागचा हेतू सफल झाला आहे की नाही, याचा निर्णय प्रक्रियेशी काही संबंध येत नाही. दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी सरकारने नोटाबंदी विषयी घेतलेला निर्णय कायदेशीर आहे व घटनाबाह्य नाही, असे निकालात त्यांनी स्पष्ट केले आहे. सवीच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नोटाबंदीचा निकाल योग्य ठरवताना त्याला आव्हान देणा?्या सर्व ५८ याचिका रद्द ठरवल्या. खंडपीठातील न्या. बीबी नागरत्ना यांनी मात्र आपला वेगळा अभिप्राय निकाल देताना नोंदवला आहे. अधिसुचना काढून नोटाबंदी जारी केली, या प्रक्रियेलाच त्यांनी आक्षेप घेतला आहे.

एका माहितीनुसार ९८ टक्के नोटा बदलून घेतल्या गेल्या. याचा दुसरा अर्थ नोटाबंदीचा हेतू सफल झालेला नाही. अर्थात किती जणांनी नोटा बदलून घेतल्या या निकषावर नोटाबंदीची पक्रिया योग्य की अयोग्य हे सवीच्च न्यायालय ठरवू शकत नाही.

नोटाबंदी करण्यामागचा हेतू योग्य होता, पण काळा पैसा बाहेर काढणे, त्याला चाप लावणे, दहशतवादाला पुरविल्या जाणा?्या पैशाला लगाम घालणे, देशात रोखीचे व्यवहार कमी व्हावेत यासाठी प्रयत्न करणे, बनावट नोटा संपुष्टात आणणे अशी कारणे सरकारने दिली. त्यासाठी उचलेले पाऊल हे कायदेशीर ठरू शकते का, अशी शंका न्या. बीबी नागरत्ना यांनी व्यक्त केली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या सल्लामसलतीनंतरच केंद्र सरकारने नोटाबंदीचा निर्णय घेतला, असे म्हटले की पुढचे प्रश्न उपप्रश्न सारेच बंद होतात. कोणत्या नियमानुसार सरकारने ५०० व १००० रूपयांचा नोटा रद्द करण्याचा निर्णय घेतला असा प्रश्न सवीच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सरकारला जरूर विचारला पण रिझर्व्ह बँकेच्या सल्लामलसतीची ढाल सरकारने पुढे केल्यावर सरकारने निर्णय चुकीचा घेतला असे कसे म्हणता येईल? गेल्या वर्षी नऊ नोव्हेंबर रोजी सरकारने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात पाचशे व एक हजार रुपयांच्या नोटांचा वापर चलनात मोठ्या प्रमाणावर वाढला होता. म्हणूनच फेब्रुवारी ते नोव्हेंबर या काळात सरकारने रिझर्व्ह बँकेशी विचार विनियम केला व त्यानंतर नोटाबंदीचा निर्णय घेतला, असे नमूद केले आहे. भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियमातील तरतुर्दीनुसार चलनातील कोणत्याही नोटा रद्द करण्याचा सरकारला अधिकार नाही, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले होते. पण सरकारने बचाव करताना काळा पैसा हुडकून काढण्यासाठी, कर चोरी व टेरर फंडिंग रोखण्यासाठी सरकारने जे उपाय योजले, त्यातलाच नोटबंदी हा एक निर्णय होता, असे म्हटले. रिझर्व्ह बँकच्या केंद्रीय संचालक मंडळाच्या शिफारसीनुसारच केंद्र सरकारने नोटाबंदीचा निर्णय घेतला, असा खुलासा केला. नोटाबंदीनंतर बनावट नोटांचे प्रमाण कमी झाले, आर्थिक व्यवहार हे डिजिटील पध्दतीने अधिक प्रमाणावर होऊ लागले. बेहिशेबी उत्पन्न कुठून कसे येते याची माहिती मिळू शकली असे सरकारने न्यायालयापुढे सांगितले.

नोटाबंदीनंतर विवेक शर्मा यांनी २०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून केंद्र सरकारच्या निर्णयाला आव्हान दिले होते. त्यानंतर पाठोपाठ आणखी सत्तावन्न याचिका दाखल झाल्या. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सरकारने नोटाबंदीचा निर्णय बेकायदेशीररित्या घेतला असल्याचे ठामपणे प्रतिपादन केले. १६ डिसेंबर २०१६ रोजी सवीच्च न्यायालयाने नोटाबंदीचे प्रकरण पाच न्यायाधिशांच्या खंडपीठाकडे सोपवले. सवीच्च न्यायालयाने नोटाबंदीच्या निर्णयाला स्थगिती तर दिली नाहीच पण विविध राज्यांतील उच्च न्यायालयात नोटाबंदी विरोधात ज्या याचिका दाखल झाल्या होत्या, त्यांच्या सुनावणीला मात्र मनाई केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आठ नोव्हेंबर २०१६ रोजी देशाला संबोधित करताना रात्री बारा वाजल्यापासून पाचशे व एक हजार रूपयांच्या नोटांवर सरकारने बंदी जारी केल्याचा निर्णय घोषीत केला. तो निर्णय चुकीचा नव्हता, असा निकाल सवीच्च न्यायालयाने सहा वर्षांनंतर दिला.

# सत्यशोधक कृष्णराव भालेकर व अमरावती जिल्हा

सत्यशोधक कृष्णराव भालेकर आणि वऱ्हाडप्रांत, त्यातही वऱ्हाडातील पश्चिम भाग आणि त्यातही अमरावती जिल्हा यांचा एक अनोन्य साधारण असा संबंध असल्याचे दिसून येते. हाच विचारबंधाचा आणि स्नेहबंधाचा धागा पुढे कृष्णराव भालेकरांचे पुत्र मुकुंदराव पाटील यांच्याशी तर आज मुकुंदरावांचे नातू उत्तमराव पाटील येऊन पोहचला आहे.

कृष्णराव भालेकर सुमारे १९०२ मध्ये जबलपूर–गोंदिया रेल्वेच्या कामाकडे गेले. तत्पुर्वी १९०० साली ओतूरच्या शास्त्री नारोबाबाजी महाधट आणि शास्त्री रामजी डुंबरे या दोन मराठा गृहस्थांनी करजगाव ता.अचलपूर (हल्ली चांदूरबाजार) येथे सत्यशोधक समाज स्थापन केला होता. नारोबाबाजी महाधट आणि शास्त्री रामजी डुंबरे अमरावती जिल्ह्यातील करजगाव, बेलुरा, ता.मोर्शी (हल्लीचा चांदूरबाजार) व नायगाव ता.चांदूररेल्वे (हल्ली धामणगांव रेल्वे) या गावी राहून सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन करुन समाज कार्य केले होते.

पुण्यातील सत्यशोधक समाजात कार्य करीत असतानाच या दोहोंशास्त्रीशी कृष्णरावांचा परिचय होताच, तोच धागा पकडून कृष्णराव भालेकर करजगावकर मंडळीशी परिचित झाले. पुढे कृष्णराव भालेकरांचा बेलुरा, नायगाव, कावली व शिंगणापूर या गावातील सत्यशोधक कार्यकर्त्यांशी संबंध आला आणि त्यातूनच त्यांनी नवीन कल्पना जाहीर सभेत व प्रत्यक्ष भेटीत कार्यकर्त्यांशी मांडलेल्या दिसतात. काही कल्पना पुर्णत्वास नेण्यास त्यांना यश आले तर काही कल्पना फक्त चर्चा आणि कागदावच राहिलेल्या दिसतात. तरीही वऱ्हाडातील पश्चिम विभागातील मात्र ते आयुष्याच्या अखेर पर्यंत जीवा भावाचे संबंध ठेवून होते असे दिसते.

या परिसरात काम करीत असताना करजगार येथे त्यांनी दिलेले व्याख्याने महत्वाची होती. एक व्याख्यान धर्म विषयक तर दुसरे व्याख्यान लहान गरीब शेतकऱ्यांशी एकत्र येऊन त्यांच्या शेतमालाशी संबंधित असे कारखाने काढण्या बाबतचे होते. कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी या नावाची संस्था स्थापन व्हावी म्हणून करजगाव येथे ता.१८ व २८ सप्टेंबर १९०२ रोजी भरलेल्या जाहीर सभेत कृष्णराव पांडूरंग भालेकर यांची भाषणे झाली होती. त्या जाहीर सभेत त्यांनी शेतकऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस वाईट होत चालली आहे. त्यास अज्ञान कारणीभूत आहे त्यावर उपाय म्हणून विद्या आणि उद्योग यांचे मिक्चर करुन त्यावर उपाय, शोधून रामबाण औषध काढणे आवश्यक आहे. हे नमूद करुन **धी करजगाव इंस्ट्रियल ॲंड कमर्शियल ॲग्रिकच्यारिस्ट कंपनी** म्हणजे करजगाव येथे कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी स्थापना करण्याचे सांगितले. मदतीकरिता त्यांनी मुंबईहून रा.रा. काशिनाथजी देवजी धुस यांनाही पुर्वीच्या सभेकरिता आणीले होते. या सभेत भालेकरांच्या सुचना पसंत वाटून काही मंडळींना ॲग्रिकच्यारिस्ट या सभेत भालेकरांच्या सुचना पसंत वाटून काही मंडळींनी प्रतिक्रीया व्यक्त केल्या. त्यामध्ये राजारामजी भगवानजी डवरे प्रांत सेक्रेटरी, स.शो.स.बेलोरा, तातोबा बाबुराव इंग्लीश टीचर करजगाव, कृष्णरावजी कर्काजी चवधरी, सेक्रेटरी स.शो.स. करजगाव, काशिनाथजी देवजी धुस चीफ इन्स्पेक्टर वा.मुंबई, कृष्णाजी तान्हाजी चवधरी, सदाशिव रामजी कांडलकर, भगवंत बाळाजी कांडलकर, शंकरराव बाळाजी म्हाला पाटील, अमृतराव कृष्णाजी चवधरी (चौधरी), कृष्णाजी लक्ष्मण सोनार, निळकंठराव व खुशालजी चौधरी, धनाजी केशवजी निंबकर, रामजी गंभीरजी चरचण आणि शेषराव रामराव देशमुख सर्व करजगाव, यावेळी कंपनीचे भाग भागभांडवलात ३९,१९०/– (एकोणचाळीस हजार एकशे नव्वद) रूपयाचे भाग घेतलेले व वचन दिलेले ४९ जणांचे नावे आढळतात. हा रिपोर्ट १ जानेवारी १९०३ ला लार्ड गंज–जबलपूर सी.पी. येथे हरिशंकर दादाजी कवले बी.ए.कॉलेज जबलपूर यांनी लिहिला आहे. (भालेकर समग्र वाड्मय संपादक सीताराम रायकर, पृ.१६०,१६१,१६२,१६३)



शेतकऱ्यांची स्थिती कशी बदलेल या विषयाचा ध्यास त्यांना लागलेला असे. त्यामुळेच बेलुरा येथे असताना १९०४ साली त्यांनी पाणी खेचण्याचा पंप तयार करण्याचे प्रयत्न केले. १९०४ च्या जुलै महिन्यात बेलुरा येथे यशवंतराव देशमुख यांच्या मदतीने पाणी काढण्याचे यंत्र प्रयोगही केले शेतकऱ्यांनी डोळे उघडा ह्या संबंधीचे भाषण त्यांनी अकोला येथे केले होते. १९०८ साली भालेकर आणि कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सहवासात आल्यानंतर विठ्ठल रामजीनी आपल्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे काम सुरु केले होते. त्याचा प्रसार महाराष्ट्रात जागोजागी व्हावा यासाठी ते प्रयत्न करीत होते. आपले काम वऱ्हाडात वाढविण्यासाठी वऱ्हाडात काम केलेले कृष्णराव भालेकर यांनी जाणोजी बोर्डींगात अकोला येथे काम पाहण्यास पाठविले. या बोर्डीगात त्यांनी आठ महिनेच काम केले. हे बोर्डिंग १८८४ साली जाणोजी कचरूजी खंडारे पारस, ता.बाळापूर, जि.अकोला येथील श्रीमंत गृहस्थांनी खोलेश्वर मंदिरा समोरच्या जागेत सुरु केले होते. अकोला जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक प्रा. प्रकाश जंजाळ यांच्या मते हे बोर्डिंग भारतातील अस्पृश्य समाजाकरिता सुरु केलेले पहिले असावे. ते भारतातील पहिले असेल किंवा नसेल परंतु वऱ्हाड प्रांतातील मात्र अस्पृश्य विद्यार्थ्याकरिता चालविलेले पहिले बोर्डिग निश्चितच होते. या ठिकाणी भालेकर ८ महिने होते. या काळातील वाशिमच्या मयाचार्य यांच्याशी त्यांचा पत्रव्यवहार होता. पुणे मिशननशी झालेल्या मदभेदातून भालेकरांनी बोर्डिंगच्या कामाचा राजीनामा दिला.

याच दरम्यान अकोला येथे असतांनाच वऱ्हाडातील खुशालराव सूर्यभानजी पाटील कावलीकर, रामराव पाटील, यशवंतराव खुशालराव देशमुख, रामरामजी डवरे, मोतीराव तुकाराम वानखेडे, कृष्णाजी कर्काजी चौधरी, गुलाबराव नायगावकर, सालोरेकर जयराम पाटील, रामचंद्र सूर्यभानजी पाटील, बळीराम विक्रमजी पाटील, देशमुख रा. खानापूर ता. मोर्शी, रामराव तवळेकर, गणपतराव मराठे खल्लार यांच्याशी १९०९ मध्ये पत्रव्यवहार करुन वऱ्हाडात सत्यप्रकाश नावाचे पत्र अमरावती (पुर्वीचे उमरावती) येथे १ एप्रिल १९०९ पासून प्रत्येक गुरुवारी प्रसिद्ध होईल असेही ठरले होते. त्यांची वार्षिक अगाऊ फी रू.२/– व अमरावती शहराला रू.१/– पडेल अशी संकल्पना त्यांनी मांडली होती. परंतु हे पत्र प्रत्यक्षात सुरु झाल्याचे दिसत नाही. त्यावरुन भालेकर वऱ्हाडकर मंडळीवर थोडे नाराज झाले होते.

त्याच काळात त्यांनी अमरावती येथे तिसरी मराठा शिक्षण परिषद व्हावी याकरिता व सत्यशोधक समाजाची पहिली बैठक पुण्यास भरवावी याकरिता सुद्धा पत्रव्यवहारातून वऱ्हाडकरांशी चर्चा केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अमरावती येथे निराश्रीत हिंदू बोर्डीगस्कूल स्थापन करुन बाकी धनगर, कोळी इ. जमातीची १००–१०० मुले शिकतील अशा इमारती बांधण्याची कल्पनाही मांडली होती.

अमरावती येथे असतानाच १ जून १९०९ साली शास्त्रधार नावाचे पुस्तक त्यांनी लिहिले. पुढे ते रघुनाथराव देवजी बनकर जनरल सेक्रेटरी सत्यशोधक समाज त्यांनी परेल मुंबई भोईवाडा येथून १४ जुन १९२२ ला छापून प्रसिद्ध केले होते. कृष्णराव भालेकरांच्या बोधांचा करजगावातील कार्यकर्त्यावर मोठा परिणाम झाल्याचे दिसून येते. तीच प्रेरणा घेऊन त्यांनी लेखन केल्याहेची दिसते. १९०७ साली कृष्णाजी कर्काजी चौधरी परम महासंगणकाचे जनक विजय भटकर यांचे आजोबा यांनी शेतकऱ्यांचं दुःखोद्‌गार नावाचे पुस्तक लिहिले तर १९१८ साली प्रसिद्ध झालेल्या परंतु १९०७ साली लिहिलेल्या अमृतराव कृष्णाजी चौधरी यांनी अमृतगीता हा पोथी वजा काव्य संग्रहात भालेकरांपासून प्रेरणा घेतल्याचे दिसते. अमृतराव म्हणतात ऐसेच भालेकर बोध केला वारंवार!! म्हणती भट मागता आई तरा. जयमान देती हो, अमृतगीत पृ. ७ संपादक भाऊ मांडवकर) कृष्णराव भालेकरांच्या लेखनाचा प्रभाव मो.तु. वानखेडे यांच्या लिखाणावर दिसून येतो.

एकंदर, वऱ्हाडातील लोकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे व प्रेमाचे संबंध निर्माण झाल्याचे दिसते. इकडे आले त्यावेळी ते विमनस्क मन:स्थितीत होते असे त्यांनी भगवंतराव कांडलकर करजगावकर यांना लिहिलेल्या पत्रावरून कळते. उतारवयातील बराचशा काळ त्यांचा वऱ्हाडवासीयांसोबत गेला. आपल्या मनातील सुख दुखः ते व्यक्त करीत असत. वऱ्हाडकर मंडळीशी नाते संबंध जोडण्यात सुद्धा त्यांच्या मनात होते. दीनमित्र पत्राचे संपादक मुकुंदराव पाटील यांच्यासाठी बेलुरा येथील माळी समाजाची मुलगी तरवडी येथे दाखविण्यासाठी आणली होती. अशी आठवण त्यांचे पणतू उत्तमराव पाटील यांनी प्रस्तुत लेखाच्या लेखकाला तरवडी भेटीत सांगितली होती. एवढे ते अमरावतीकरांशी एकजीव झाले होते असे दिसून येते. आजही वेगवेगळ्या माध्यमातून अमरावतीकरांनी भालेकरांची चौथी पिढी स्नेहबंध जोडून येते.

**सतीश जामोदकर**
**अखंड १२८,चंद्रावतीनगर,साईनगर जवळ अमरावती मो.९४२३३७४६७८**

# पेढे वाटून साजरा केला महिला शिक्षण दिवस



**नागपूर:–** १७५ वर्षांपूर्वी आजच्या दिवशी १ जानेवारी १८४८ ला राष्ट्रनिर्माता ज्योतिराव गोविंदराव फुले यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली.आद्यशिक्षिका माता सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका म्हणून सेवा दिली.चिकलफेक, दगडफेक, शिव्याशाप सहन करून आपले आद्यकर्तव्य या महिला वर्गाला शिकवणे आहे हे जाणून सर्व अळथळ्यांना पार करत शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.त्या दिनानिमित्ताने आज १ जानेवारीला या महामानवांना अभिवादन करण्यासाठी कॉटन मार्केट चौकातील पुतळ्यांना माल्यार्पण करुन सर्वांना पेढे वाटून आजचा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.यावेळी उमेश कोरारम,दीनानाथ वाघमारे,मुकुंद अडेवार,धीरज भिषिकर,कुलदीप सोनकुसरे, पियुष आकरे,कृताल आकरे,प्रतीक बावनकर,यजुर्वेद सेलोकर,आणि इतर मार्केट परिसरातील दुकानदार बंधू उपस्थित होते.

**गोंदियातही महामानवांना अभिवादन**

गोंदिया:–१७५ वर्षांपूर्वी आजच्या दिवशी १ जानेवारी १८४८ ला राष्ट्रनिर्माता ज्योतिराव गोविंदराव फुले यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली.आद्यशिक्षिका माता सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका म्हणून सेवा दिली.चिकलफेक,दगडफेक ,शिव्याशाप सहन करून आपले आद्यकर्तव्य या महिला वर्गाला शिकवणे आहे हे जाणून सर्व अळथळ्यांना पार करत शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.त्या दिनानिमित्ताने आज १ जानेवारीला या महामानवांना येथील ओबीसी कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

यावेळी ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे, डॉ.रुपसेन बघेले, ओबीसी संघर्ष समितीचे महासचिव शिशिर कटरे,कोषाध्यक्ष कैलास भेलावे, प्रसिद्धीप्रमुख महेंद्र बिसेन, ओबीसी सेवा संघाचे पी.डी.चव्हाण, डॉ.प्रा.संजीव रहांगडाले,भारतीय पिछडा शोषित संघटनेचे अध्यक्ष प्रेमलाल गायधने, प्रमोद भोयर, पवार प्रगतीशिल मंचचे अध्यक्ष एड.पी.सी.चव्हाण, भागचंद रहांगडाले गोंदिया खादी ग्रामोद्योगचे सचिव राजकुमार(पप्पू)पटले उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात



**गोरेगाव:–** परशुराम विद्यालय मोहगाव बु.येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती शाळेचे मुख्याध्यापक बी.डब्लु.कटरे यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या प्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.शाळेतील स.शिक्षिका कु.ममता गणविर,स.शि.प्रियांक पटले तसेच शाळेचे मुख्याध्यापक .बी.डब्लु.कटरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जिवनावर व त्यांनी केलेल्या कार्याची विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे संचालन व्ही.एस.मेश्राम तर आभारप्रदर्शन श्रीमती भारती कटरे यांनी केले.या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# इटखेडा ग्रामपंचायत कार्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**अर्जुनी मोर–** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती ग्रामपंचायत इटखेडा साजरी करण्यात आली.याप्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना पुष्पहार अर्पण करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बद्दल सरपंच सौ आशाबाई झिलपे ,माजी सरपंच उद्धव मेहंदळे इंद्रदास झिलपे व इतरांनी मार्गदर्शन केले .यावेळी नवनिर्वाचित सरपंच नवनिर्वाचित सरपंच आशाबाई झिलपे ,ग्रामपंचायत सदस्य सौ माया नत्थु धांडे ,वर्षा नितेशकुमार कावळे, वर्षा गिरीश कोटरंगे ,छाया जागृत लोणारे ,उज्वला समीर गोंडाने, ग्राम पंचायत सदस्य संजय नामदेव कांबळे, सचिन गुरुदेव लांजेवार, आशीर्वाद सुभाष लांडगे, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# मॉडेल कॉन्व्हेंट एंड सायन्स ज्यू. कॉलेजमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात



**गोरेगांव:–**स्थानीय मॉडेल कॉन्व्हेंट एंड सायन्स ज्यू. कॉलेज मध्ये ३ जाने. हा दिवस क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त बालिका दिवस म्हणुन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला शाळेचे संस्थापक प्रा. आर. डी. कटरे हे अध्यक्ष म्हणुन तर प्रशासकीय अधिकारी सी.बी.पटले,प्राचार्य सौ.सी.पी.मेश्राम,पर्यवेक्षक कु.एस.डी.चीचामे हे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांनी भाषण,गितातून माहिती सादर केली.प्रमुख पाहुण्यांनी कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.अध्यक्ष म्हणुन लाभलेले श्री तुलसी शिक्षण संस्था गोरेगांवचे सचिव प्रा.आर.डी.कटरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद,विद्यार्थी,शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.महिला शिक्षक दिनानिमित्त शाळेतील सर्व महिला शिक्षिकांचा सत्कार करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थीनी कु.वैभवी ठाकूर,कु.खुशी पुंजे यांनी केले तसेच आभार कु. वैष्णवी रहांगडाले हिने मानले.

# आदर्श सार्वजनिक वाचनालय येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी



**गोरेगांव:–** तालुक्यातील मोहाडी यथील अ दर्जा प्राप्त ग्रंथालय आदर्श सार्वजनिक वाचनालय येथे ३ जानेवारीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे उपाध्यक्ष मदनलाल बघेले तर प्रमुख अतिथि ग्रांम पंचायत मोहाडीचे नवनिर्वाचित सरपंच नरेंद्रकुमार चौरागडे, संस्थेचे संस्थापक सचिव ग्रंथमित्र वाय.डि.चौरागडे, सदस्य जे.जे.पटले,हिरालाल महाजन,देवदास चेचाने, सेवानिवृत्त शिक्षक वाय.एफ. पटले,सेवानिवृत्त शिक्षक चैतराम डोहले,दुलीचंद शोरले, भैयालाल चौधरी,परमानंद तिरेले,मुकेश येरखडे,दुर्गेश चेचाने,कुल्लु वरखडे,आशा चेचाने आदी उपस्थित होत.यावेळी ग्रांम पंचायत सरपंच नरेंद्रकुमार चौरागडे यांनी मार्गदर्शनात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ ला सातारा जिल्हातील नायगांव येथे झाला असून सावित्रीबाई फुले यांचे आईचे नाव सत्यवती नेवसे,वडील खंडोजी नेवसे पाटिल,पती जोतीराव फुले सावित्रीबाई जोतीराव फुले ह्या भारतीय शिक्षिका, कवयित्री व समाज सुधारक होत्या. फुले यांनी आशिया खंडातील पहिली शाळा सुरू केली. सावित्रीबाई यांनी जोतिबाच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतल्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन व आभार सुभाष चौरागडे यांनी मानले.

# सावत्रीमाई फुले महिला शिक्षणाच्या उध्दारकर्त्या



सावित्रीमाई फुले या पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मुलींचे शिक्षण आणि स्त्रियांचे कल्याण साधण्यात व्यथित केले. मुलींना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी ज्योतिबा फुले यांच्या साह्याने पुणे शहरात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यानंतर त्यांनी समाजामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध देखील लढा दिला. त्यांनी केलेले कार्य संपूर्ण स्त्रियांसाठी खूपच मूल्यवान आहे.

आजच्या या पोस्टमध्ये सावित्रीमाई फुले यांच्या वर निबंध लिहून दिलेला आहे. या निबंधातून सावित्रीमाई फुले यांची संपूर्ण माहिती, शिक्षण, पुरस्कार, कार्य या बद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. हा निबंध सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी खूप उपयुक्त आहे.

सावित्रीमाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा येथे झाला. सावित्रीमाई फुले यांचे वयाच्या नऊव्यावर्षी जोतिबा फुले यांच्याशी लग्न झाले. महात्मा ज्योतिबा फुले हे एक महान विचारवंत समाजसुधारक, लेखक आणी क्रांतिकारक होते. सावित्रीमाई फुले यांना भारताची पहिली महिला शिक्षिका म्हणून ओळखले जाते.

त्यांना भारतीय स्त्रीविधाची जननी मानले जाते. त्यांचे पती जोतिबाराव फुले यांच्या प्रदेशात त्यांनी भारतातील महिला आधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीमाईनी आणि ज्योतिबारावांनी १ जानेवारी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा उघडली.

त्यांनी विधवा, केशवपन थांबवण्यासाठी नहाव्याचा संप केला. सवित्रीमाईच्या आईचे नाव लक्ष्मीबाई होते तर वडीलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते . सावित्रीमाईचे सासरे गोविंदराव फुले हे मूळचे फुरसुंगीचे गोरे परंतु पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुलबागेची जमीन बक्षीस म्हणून दिली. त्यामुळे त्यानंतर त्यांचे गोरे हे आडनाव संपुष्टात येऊन तेथील लोक त्यांना फुले या नावाने ओळखू लागली.

सावित्रीमाई फुले यांचे टोपण नाव ज्ञानज्योती आणि ज्योती असे होते. सावित्रीमाई फुले या धर्माने हिंदू होत्या. त्यांचा जन्मदिवस हा संपूर्ण भारत देशात बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. स्वतः सावित्रीमाई मुलींना शिकवण्यासाठी शाळेत जात असत. त्याकाळी मुलींना शिक्षण घेण्यास त्या काळातील लोकांची परवानगी नव्हती. त्यामुळे सावित्रीमाई देखील सुरुवातीला अशिक्षित होत्या. मुलींना शाळेत शिकवण्या अगोदर सावित्रीमाईनी ज्योतिबा फुले यांच्याकडून शिक्षणाचे धडे घेतले.

पण त्याकाळी मुलींना शिकवणे हे इतके सोपे नव्हते. त्यांना लोकांच्या कडक विरोधाचा सामना करावा लागला. सावित्री माई शाळेत जात असताना धर्माचे आणि स्त्री शिक्षणाचे विरोधी लोक कचरा , गाळ, आणि शेण त्यांचावर टाकत. यामुळे सावित्री माईंचे कपडे घान व्हायचे , म्हणुन त्या आणखी एक साडी आपल्या सोबत घ्यायच्या आणि शाळेत आल्यावर ती साडी बदलत असे.इतके असूनही त्यांनी हार मानली नाही. स्त्री बालहत्या रोखण्यासाठी त्यांनी नवजात मुलांसाठी एक आश्रम ही उघडल. त्यानंतर सावित्रीमाई फुले यांनी माघे फिरून पाहिले नाही. त्यांच्या जीवन काळात त्यांनी पुण्यात १८ महिला शाळा उघडल्या. जोतिबा फुले हे स्वतः अध्यक्ष होते आणि सावित्रीमाई फुले या महिला विभागाच्या प्रमुख होत्या.जोतिबा फुले यांनी जन्मभर खालच्या जाती, महिला आणि दलीत यांच्यासाठी काम केले. या कामात सावित्रीमाई फुले आणि त्यांचे पती ज्योतिबा फुले यांनी मोलाची कामगिरी केली.

सावित्रीमाई फुले यांनी स्त्री कल्याणासाठी देखील खूप कार्य केले. त्यांनी स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबावे यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी आपल्या पती समवेत काशीबाई नावाच्या विधवेचा स्वीकार केला आणि तिला आपुलकी दिली. नंतर त्यांनी यशवंत नावाच्या मुलाला दत्तक घेतले. त्याला चांगले संस्कार व शिक्षण दिले. तो मुलगा नंतर मोठा डॉक्टर झाला. सावित्रीमाई फुले मुळे आज प्रत्येक घरातील मुली शिकत आहेत. सावित्रीमाई शिकल्या म्हणून मुलींना स्वतःचा हाक निर्माण करता आला.

सावित्रीमाई फुले यांनी प्रत्येक महिलांचे जीवन जगणे सोपे केले आहे. आज प्रत्येक जागी स्त्रीला मान दिला जात आहे म्हणून त्या खूप मेहनत करत आहेत. पहिल्या कली स्त्रियांना शिक्षण घेण्याचे, मनसोक्त जगण्याचे अधिकार नव्हते आणि आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियाच अव्वल आहेत. त्यांच्यामुळेच आज सर्व क्षेत्रात स्त्रियांना स्वातंर्त्य आहे. सावित्रीमाई शिकल्या नसत्या तर आजही स्त्रिया चूल आणि मूल यातच गुंतून राहिल्या असत्या.

सावित्रीमाई फुले या अगदी नऊ वर्षांच्या असताना त्यांचा विवाह महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी लाऊन देण्यात आला. परंतु त्यांना स्त्रियांवरील बंधने मुळीच मान्य नव्हती. त्यामुळे स्त्रियांवरील अत्याचार थांबावे यासाठी स्त्रियांचे कल्याणासाठी काम करायला सुरु केले. त्यांना माहिती होते की जर स्त्रियांना समाजात मान, संमान मिळवून द्यायचा असेल, त्यांच्यावरील अत्याचार थांबवायचे असतील तर त्यांना अगोदर शिक्षित करणे खूप गरजेचे आहे. म्हणून त्यांनी पुण्यातील भिडे गुरुजी यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. सावित्रीमाई फुले या लेखिका आणि कवयत्री सुद्धा होत्या. त्यांनी १८५४ मध्ये काव्यफुले आणि १८९२ मध्ये बावन काशी सुबोध रत्नाकर प्रकाशित केले आणि "जा शिक्षण मिळवा" नावाची कविता प्रकाशित केली. ज्यामध्ये त्यांनी वंचित लोकांना शिक्षण घेऊन स्वतः ला मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले.

त्यांनी महिलांसाठी निवारा स्थान उघडले जिथे ब्राह्मण विधवा त्यांच्या मुलांची साक्षी तकणे प्रसूती करू शकत होत्या. सावित्रीमाई आणि ज्योतिरावांनी सती प्रथेला कडाडून विरोध केला आणि त्यांनी विधवा आणि वंचित मुलांसाठी आश्रमाची स्थापना केली. सावित्रीमाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी खूप मोलाचे योगदान दिले आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# खरिपाची अंतिम आणेवारी ८९ पैसे

**गोंदिया:** राज्य शासनाने जिल्ह्यातील खरीप हंगामातील अंतिम आणेवारी ८९ पैसे जाहीर केली आहे. जिल्ह्यात एकूण ९५५ गावे असून त्यानुसर जिल्ह्यातील ९१३ गावांची आणेवारी ५० पैशांवर आली असून ५० पैशांखाली आणेवारी असलेल्या गावांची संख्या सहा आहे. तर ३६ गावांमध्ये पीक नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. या गावांच्या अंतिम पैसेवारीला मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.



जिल्ह्याची अर्थव्यवस्था पूर्णत: शेतीवर अवलंबून आहे. जिल्ह्यात एकूण लागवडीखालील क्षेत्र २ लाख २ हजार ८३.९० हेक्टर असून १ लाख ९२ हजार २७५.२५ हेक्टर क्षेत्रात खरीप हंगामात पिकांची लागवड करण्यात आली होती. तर ३६०.८८ हेक्टर क्षेत्र पडीत होते. खरीप पिकांची अंतिम पैसेवारी चावडीवर आणि ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डावर तसेच नगरपंचायत आणि नगरपालिकेच्या बोर्डावर ३१ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून, तसे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत. जाहीर करण्यात आलेल्या पैसेवारीनुसार गोंदिया तालुक्यात एकुण १५३ गावे असून त्यांची पैसेवारी ०.८७ इतकी आली आहे. गोरेगाव तालुक्यातील ९४ गावांची आणेवारी ०.९४, तिरोडा तालुक्यातील १२३ गावांची आणेवारी ०.७८, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील १४८ गावांची आणेवारी ०.८८, देवरी तालुक्यातील १२८ गावांची आणेवारी १.०३, आमगाव तालुक्यातील ८३ गावांची आणेवारी ०.८८, सालेकसा तालुक्यातील ८६ गावांची आणेवारी ०.८५ आणि सडक अर्जुनी तालुक्यातील १०४ गावांची आणेवारी ०.८८ इतकी आहे. जिल्ह्यातील जाहीर करण्यात आलेल्या एकूण ९१९ गावांची आणेवारी ०.८९ इतकी आहे.

### आणेवारी डोळ्यांत धूळ टाकणारी

**जिल्हाधिकारी कार्यालयाने जाहीर केलेल्या आणि राज्य शासनाने अंतिम मंजूरी दिलेल्या एकुण ९०१ गावांपैकी सर्वाधिक आणेवारी देवरी तालुक्याची असून ती १.०३ पैसे इतकी आहे. तर सर्वात कमी ०.७८ पैसे आणेवारी तिरोडा तालुक्याची आहे. उल्लेखनीय म्हणजे कीड रोगांमुळे देवरी आणि सालेकसा तालुक्यात मोठे नुकसान झाले. अनेकांना वर्षभर खाण्यापुरती उरेल इतके देखील उत्पादन झाले नसताना आणेवारी चांगली दाखविण्यात आली. त्यामुळे ही आणेवारी फसवी असून शेतकऱ्यांच्या डोळ्यात धुळ टाकणारी असल्याचे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केले.**

### जिल्हा प्रशासनाची महिती

**जिल्ह्यातील एकुण ९५५ गावांपैकी ३६ गावांमध्ये पीक नसल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. त्यापैकी रीठी गावे २४ असून धरणखालील बुडीत गावे १२ आहेत. त्यात गोंदिया आणि आमगाव तालुक्यातील एकाही गावाचा समावेश नसून गोरेगाव तालुक्यातील ५, तिरोडा २, अर्जुनी मोरगाव ११, देवरी ७, सालेकसा ६ आणि सडक अर्जुनी तालुक्यातील ५ गावांचा समावेश आहे.**

# ओबीसी वसतीगृह सुरु करण्यासाठी मंत्र्याचे निर्देश,खासगी इमारतीत होणार वसतीगृह

**गोंदिया :** राज्य सरकारच्या मंत्रीमंडळ बैठकीत ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांसाठी राज्यात ७२ ओबीसी वसतीगृह तसेच ओबीसी विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणासाठी ५० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या निर्णय घेण्यात आला होता. दरम्यान २८ डिसेंबर रोजी नागपूर येथील विधानभवनात या मागणीला घेऊन ओबीसी अधिकार मंच व ओबीसी संघटना तसेच युवा अधिकार मंच संघर्ष समितीच्या वतीने आमदार विजय रहांगडाले यांच्या सोबत ओबीसी मंत्री अतुल सावे यांना निवेदन दिले. दरम्यान ओबीसी मंत्र्यांनी भाड्याच्या इमारतीत वसतीगृह सुरू करण्याचे निर्देश यंत्रणेला दिले.



इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे इतर मागास प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर विद्यार्थ्यांसाठी ७२ वसतीगृहे सुरु करणार तथा इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ आता ५० विद्यार्थ्यांना मिळणार व पोलीस शिपाई संवर्गातील २०२१ मधील सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पदभरती निर्बंधामधून सूट देवून एकूण वीस हजार पदे गृह विभागातर्फे भरणार, आदी निर्णय राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत घेतले होते.

ओबीसी अधिकार मंच, ओबीसी युवा अधिकार मंच, ओबीसी व्हीजेएनटी एसबीसी समन्वय समिती,गोंदिया जिल्हा ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी सेवा संघ,ओबीसी जनमोर्चा, अखिल भारतीय पिछडा शोषित संघटनेच्यावतीने मागील अनेक वर्षापासून ओबीसी विद्यार्थ्यांकरीता वसतीगृहे, परदेशाती उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व पोलीस भरती याकरीता राज्य सरकारकडे या मागण्याच रेटा सतत लावून धरला होता. ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे, ओबीसी व्हीजेएनटी एसबीसी समन्वय समितीये सयोंजक उमेश कोरीराम, नितेश कराडे, धीरज भिसीकर, मुकूंद अडेवार, पियुष आकरे, निरज सोनेवाने यांनी आमदार विजय रहांगडाले सोबत ओबीसी मंत्री अतुल सावे यांना साकळे घातले. यावर ओबीसी मंत्र्यांनी तातडीने निर्देश देत भाड्याच्या इमारतीत वसतीगृह सुरू करण्याचे निर्देश यंत्रणेला दिले.

# खा.प्रफुल पटले यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**गोंदिया:** नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत गोंदिया तालुक्यातील देऊटोला येथील सरपंच व सदस्य, ग्रामपंचायत चारगाव येथील सदस्य व वळद येथील अनेक कार्यकर्त्यांनी खा. प्रफुल पटेल यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. खा. प्रफुल पटेल यांनी पुष्पगुच्छ देऊन नवनिर्वाचित सरपंच व सदस्य यांचे स्वागत केले.



कार्यक्रमाला माजी आमदार राजेंद्र जैन, वीरेंद्र जयस्वाल, केतन तुरकर, राजू एन. जैन, राजेंद्र टेम्भरे, प्रदीप बावनकर, सुनील पटले, शैलेश वासनिक, कपिल बावनथले, पिंटू बनकर, कुणाल बावनथडे, पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

राष्ट्रवादीत प्रवेश करणाऱ्यामध्ये देऊटोला येथील सरपंचा अल्काताई मेश्राम व ग्रामपंचायत सदस्य वसंत उपवंशी, विद्या सहारे, शुभांगी गजभिये, हिरवंता वाघाडे, नीलवंता तुपटे, सुनीता कांबडे ग्रामपंचायत चारगाव येथील राधेश्याम पटले, समलेश्वर बिसेन, रेवेंद्र टेंभरे, ब्रिजलाल टेंभरे, मधुकर साठवणे, दीपक बिसेन, प्रमोद बिसेन, ललित पटले, शंकर साकुरे, तरुण पटले, पप्पू टेंभरे, ईश?वरी पटले, धनीलाल पटले, रेवेंद्र सिरसाठ, महेंद्र गुरदे, रवी देशमुख, राजकुमार पारधी, प्रमोद टेम्भारे, विनोद टेंभरे, रणजित बरेले, देवेंद्र राऊत, अंकित बिसेन, लालचंद साठवणे, अनिल बरइकर, राजू धावडे, धर्मराज नागपुरे, वळद येथील सेवा सहकारी संस्था अध्यक्ष गेशकुमार उपवंशी, उदाराम कांबडे, रंगलाल उपवंशी, शिवानंद बनकर, मनोजकुमार उपवंशी, अशोक देशमुख, चुन्नीलाल शहारे, रवीकुमार उपवंशी, रजनीकांत गजभिये यांचा समावेश आहे. खा. प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व विकासात्मक दृष्टीकोनातून व गावाच्या विकासासाठी फक्त आणी फक्त खा. प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात व माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनात विकास होऊ शकतो त्यामुळे आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करीत आहोत, अशी भावना सर्व प्रवेशीतांनी व्यक्त केली.

# पांगोली नदीच्या पुनजीवनकरीता केंद्रीय जलमंत्र्यांना खा.मेंढेचे साकडे

**गोंदिया:**– गोंदिया जिल्ह्यातील महत्वपूर्ण ओळख असलेली आणि जिवनदायींनी असलेल्या पांगोली नदीच्या सर्वांगीण पुनर्जीवनासोबतच सौंदयीकरणासाठी केंद्रसरकारने लक्ष घालून निधीची उपलब्धता करुन देण्याची मागणी भंडारा-गोंदियाचे खासदार सुनिल मेंढे यांनी (दि.२२)केंद्रीय जलमंत्री यांच्याकडे केली आहे.



पांगोली नदी नामशेष व लुप्त होण्याच्या मार्गावर असून या नदीच्या पुनरूज्जीवन, संवर्धन, संरक्षण व विकासाचा मार्ग मोकळा होण्यासाठी गेल्या काही वर्षापासून पांगोली नदी बचाव समितीच्या माध्यमातून तिर्थराज उके व त्यांचे सर्व सहकारी काम करीत आहेत.

जिल्हा विकास निधीतूनही १० लाख रुपये या नदीच्या अभ्यासासाठी राखीव करण्यात आले. परंतु ७० किमीचा लाबं प्रवास असलेल्या या नदीकरीता हा निधी तोडगा असल्याने खासदार मेंढे यांनी पुढाकार घेत सरळ केंद्रीय जलमंत्र्यांनाच साकडे घातले आहे. गोंदिया, गोरेगाव व आमगांव या तीन तालुक्यातून जवळपास ७० कि.मी. प्रवाह क्षेत्रातून वाहणारी ही नदी आहे. गोंदिया, गोरेगांव व आमगांव तालुक्यातील काही भागातील महत्वपूर्ण नैसर्गिक जलस्त्रोत यापासून निर्माण होऊ शकत असल्याने या नदीचा पुनरुज्जीवनासाठी पुढाकार घेतला गेला आहे.

### जाती दावा पडताळणी संदर्भात आवश्यक सूचना

**गोंदिया :** सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रात ज्या मागासवगीय विद्यार्थ्यांनी आरक्षीत (अनु.जाती, विजाभज, इमाव व विमाप्र) प्रवर्गातून पुढील व्यावसायीक शिक्षणाकरीता बी.ई., वैद्यकीय पदवी, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.एड., एल.एल.बी., एम.बी.ए. पदवी अभ्यासक्रमाला सीईटी व कॅप अंतर्गत प्रवेशाकरीता अर्ज सादर केले असेल अशा विद्यार्थ्यांनी जाती दावा पडताळणीचे प्रकरण जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती गोंदिया येथे सादर केले असल्यास प्राप्त व सबळ पुरावे नुसार बहुतांश विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात आलेले आहे. संबंधितांनी दिलेल्या ई-मेल आयडीवर जात वैधता प्रमाणपत्र नियमीत पाठविण्यात येत असून अर्जदारांनी त्यांचे ई-मेल आयडीवर तपासून प्राप्त करुन घ्यावे.

# जि.प. शाळांचा मिळणार २१० स्वयंसेवक शिक्षक

**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षकांची संख्या कमी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. यावर पर्यायी व्यवस्था म्हणून मानधनतत्वावर स्वयंसेवक नेमण्यात येणार आहे.



जिल्ह्यात एकूण २१० शिक्षक या माध्यमातून मिळणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी दिली. जिल्हा परिषद गोंदियामार्फत जिल्ह्यात एकूण १०१७ प्राथमिक व पूर्व माध्यमिक शाळा चालविण्यात येत आहेत. सदर शाळेत प्राथमिक शिक्षकांच्या एकूण ३५५ शिक्षक कमी असल्याने कार्यरत शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त बोझा पडत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे कधीही भरुन न निघणारे शैक्षणिक नुकसान होत असल्याची बाब निर्दर्शनास आल्याने मानधन तत्वावर स्वयंसेवक शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव घेऊन सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आल्याने २१० शिक्षक शाळेला उपलब्ध होणार आहेत. चालू शैक्षणिक सत्रात एकूण २१० मानधन तत्वावर स्वयंसेवक शिक्षकांची नियुक्ती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्यावतीने होणार आहे. उपाध्यक्ष तथा शिक्षण समिती सभापती यशवंत गणवीर यांनी याकरिता मोलाचे सहकार्य दिले. जिल्हा परिषदेच्या माध्यमाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवक शिक्षकाच्या माध्यमाने शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिलेल्या नियोजनाकरिता जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारे ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक वर्गात उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

# ४८ तासात लाभार्थी खात्यात, १० लाख ४५ हजार रुपयांची रक्कम वर्ग

**गोंदिया :** प्रधानमंत्री मातृ वंदना योजना अंतर्गत जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागातील गर्भवती महिलांना गर्भधारणेतून शेवटच्या टप्प्यापर्यंत तसेच प्रसुतीनंतरही शारिरीक क्षमता नसतांनाही मजुरीसाठी काम करावे लागते. अशा गर्भवती महिला व माता कुपोषित राहतात. त्यामुळे त्यांच्या व नवजात बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. यामुळे प्रथमत: गर्भवतीला तसेच स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी प्रधानमंत्री मातृ वंदना योजना राज्यात २०१७ पासून सुरु केलेली आहे. या योजनेत केंद्र शासनाचा ६० टक्के व राज्य शासनाचा ४० टक्के वाटा असतो.

प्रथम खेपेतील गर्भवती मातांना गरोदरपणापासून तर बाळाच्या जन्मापर्यंत तीन टप्प्यात ५ हजार रुपये मिळतात. यासाठी गर्भधारणेपासून तर १५० दिवसाच्या आंत शासकीय आरोग्य संस्थेत नोंदणी करणे आवश्यक आहे. मात्र या योजनेअंतर्गत मातांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम वर्ग करण्यासाठी असलेल्या सुविधेत मे-२०२२ या महिन्यापासून तांत्रिक अडचण निर्माण झाली होती.

ही अडचण दूर होताच मागील आठवड्यात आरोग्य प्रशासनाने गोंदिया जिल्ह्यातील लाभार्थी मातांच्या बँक खात्यात ९० लाख ४५ हजार रुपयांची रक्कम वर्ग केलेले आहेत.

तसेच सन २०२२-२३ या वर्षात आजपर्यंत गोंदिया जिल्ह्यातील लाभार्थीना २ कोटी १४ लाख ३३ हजार रुपयांची रक्कम प्रशासनाने वर्ग केलेली आहे. तालुकानिहाय आमगाव- २६ लाख ३ हजार, अर्जुनी मोरगाव- २० लाख ६३ हजार, देवरी- १६ लाख २२ हजार, गोंदिया ग्रामीण- ५३ लाख ७ हजार, गोरेगाव- २४ लाख ५१ हजार, सडक अर्जुनी- १४ लाख ४८ हजार, सालेकसा- १४ लाख ४७ हजार, तिरोडा- २३ लाख ४९ हजार, गोंदिया शहरी- १७ लाख ६२ हजार, तिरोडा शहरी- ३ लाख ८१ हजार. अशाप्रकारे एकूण २ कोटी १४ लाख ३३ हजार रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आलेले आहे. अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांनी दिली आहे.

# जिपच्या स्थायी समितीत अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव घेण्यास मंजुरी

**गोंदिया:**- विद्यार्थ्यांमधील क्रीडा गुणांना वाव मिळावा यासाठी पूर्वी पू स्वदेशी खेळोत्तेजकते मंडळाच्या वतीने जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये क्रीडा स्पर्धांसह सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत होते. काही वर्षापुर्वी मंडळच बर्खास्त करण्यात आला. तेव्हापासून शालेय क्रीडा स्पर्धांना ब्रेक होता. आता पुन्हा या स्पर्धांचे आयोजन भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून होणार आहेत. शुक्रवार ३० डिसेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीत या संबंधिचा निर्णयर्ण घेण्यात आला आहे.यासाठी ३० लाखांचा निधीला समितीने मंजूरी दिली आहे.गोंदिया जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक व पूर्व माध्यमिकच्या १०१७ शाळांचा समावेश आहे. या शाळांमध्ये ८६ हजार ८३६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे मागासवर्गीय व इतर गरीब पालकांच्या मुले मुली अधिक प्रमाणात शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या शारिरीक विकासासाठी केंद्र, पंचायत समिती व जिल्हास्तरावर क्रीडा स्पर्धेचे आयोजन होणे अपेक्षित होते.याकरीता जिल्हा परिषद



सदस्य, शिक्षक तथा पालकांकडून क्रीडा व सांस्कृतिक स्पार्धांचे आयोजन करण्याची मागणी करण्यात आली होती. पुर्वी स्वदेशी खेळोत्तेजक मंडळाच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या जिल्हानिधी आणि लोकवर्गणी संकलीत करून उपलब्ध निधीद्वारे केंद्र, तालुका व जिल्हा स्तरावर क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत होते.विद्यार्थ्यांमधील सुप्तगुणांचा तसेच बौद्धिक व शारिरीक विकास होण्याच्या दृष्टीने तथा शालेय खेळाडूंना क्रीडा प्रकारात नैपुण्यपुर्ण कामगिरी करता यावी यासाठी स्वदेशी खेळोत्तेजक मंडळाची स्थापना करण्यात आली होती. याअंतर्गत कबड्डी,खो-खो आदी मैदानी खेळांसह सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत होते.सहा वर्षापुवी मंडळ बरखास्त करण्यात आल्याने जिल्हा

परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांना ब्रेक लागला होता. क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या आयोजन करण्याकरीता जिपचे उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती यशवंत गणवीर, बांधकाम सभापती संजय टेंभरे, कृषी व पशुसंशुवर्धनर्ध सभापती सोनू कुथे, महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम, समाज कल्याण सभापती पूजा सेठ यांच्यासह स्थायी समिती सदस्य लायकराम भेंडारकर, रजनी कुंभरे, चत्रभुज बिसेन, डॉ. लक्ष्मण भगत, सुरेश हर्षे,संदीप भाटीया, जितेंद्र कटरे आदिंनी सभेत ठराव मंजुरी करीता सहमती दर्शविली.जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी ठरावास मंजुरी दिली. आता या स्पर्धाभारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव (अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव) या नावाने आयोजित केली जाणार आहे.या स्पर्धांच्या आयोजनासाठी जिल्हा निधीतून ३० लाखांच्या निधीची तरतूद केली जाणार आहे. याबाबत योग्य नियम, अटी व शर्ती तयार करण्याचे निर्देश प्राथमिक व माध्यमिकच्या शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. या निर्णयाचे सर्व जिल्हा परिषद सदस्य,शिक्षक संघटना,पालक व विद्यार्थ्यांनी स्वागत केले आहे.

# वाघाच्या हल्ल्यातील त्या जखमीचा मृत्यू

**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील महागाव येथील जंगलशिवारात सरपणाच्या काड्या आणण्यासाठी गेलेल्या एका इसमावर वाघाने जोरदार हल्ला केला. ही घटना ७ डिसेंबरची आहे. या घटनेतील गंभीर जखमी राजकुमार बळीराम जांभुळकर (६०) रा.महागाव /सिरोली याला उपचारासाठी नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले होते. उपचारदरम्यान २९ डिसेंबर रोजी राजकुमार जांभुळकर याचा मृत्यू झाला.

सविस्तर असे की, महागाव येथील राजकुमार बळीराम जांभुळकर (६०) हा ७ डिसेंबर रोजी सरपणाच्या काड्या आणण्यासाठी अर्जुनी मोरगाव वनक्षेत्रात अंतर्गत येत असलेल्या खोळदा सहवनक्षेत्रात गेला होता. दरम्यान त्याच्यावर वाघाने जोरदार हल्ला केला. या घटनेत जांभुळकर गंभीर जखमी झाला होता. विशेष म्हणजे, वाघाच्या तावडीतून सुटका करून राजकुमार जांभुळकर या तब्बल एक ते दीड किमी अंतरावरील मुख्य रस्त्यापर्यंत पोहोचला होता. रक्तबंबाळ अवस्थेत असलेल्या राजकुमार जांभुळकर याला पाहताच वाटेकरूंनी त्याला उपचारासाठी प्राथमिक रूग्णालयात हलविले. यानंतर जांभुळकर याला जिल्हा सामान्य रूग्णालयात हलविण्यात आले. मात्र त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने नागपूर येथे हलविण्यात आले होते. मृत्यूंशी झूंज देत असताना २९ डिसेंबर रोजी त्याचा उपचारदरम्यान मृत्यू झाला. तर ३० डिसेंबर रोजी त्याच्या पार्थिवावर गावात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# रक्तदान सर्व श्रेष्ठदान : खा.प्रफुल पटेल

**गोंदिया:** सन २०२३ ची पहिल्या पहाटेचे मोठ्या आनंद व आशेने स्वागत करण्यात आले. दरम्यान अनेकांनी नववर्षात नवे संकल्प करून पुढील जीवनाचा प्रवासाला सुरुवात केली. खा.प्रफुल पटेल हे गेल्या पाच दिवसांपासून गोंदिया जिल्ह्यात आहेत. दरम्यान (ता.१) नववर्षाच्या पहिल्या दिवशी आयोजित शिबिरात त्यांनी रक्तदान केले. या माध्यमातून रक्तदान सर्वश्रेष्ठ दान, असा संदेश देत प्रत्येक नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन केले.



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा.प्रफुल पटेल हे मागील चार दिवसांपासून गोंदिया जिल्ह्यात आहेत. दरम्यान सातत्याने गोंदिया व भंडारा या दोन्ही जिल्ह्यांचा दौरा करून कार्यकर्त्यांशी संवाद साधत आहेत. त्याचप्रमाणे अनेक कार्यक्रमात हजेरी लावत आहेत. (ता.१) नववर्षाच्या पर्वावर त्यांच्या निवासस्थानी सोच सेवा संस्थेच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात स्वयंस्फूर्तपणे सहभागी होवून त्यांनी रक्तदान केले.

याप्रसंगी रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असून नव्या वर्षात प्रत्येकाने रक्तदान करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. या शिबिरात माजी आमदार राजेंद्र जैन यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येत सहभागी झाले होते.

# चांद-सूरज येथे नवीन वर्षाचा पहिला सूर्योदय

**सालेकसा:** २०२२ चा सूर्य मावळत असून २०२३च्या सुर्योदय झाला आहे. महाराष्ट्राचा पहिला सुर्योदय सालेकसा तालुक्यातील चांद-सूरज या गावात होतो. चांद-सूरज गाव महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्याच्या सीमेवर असून या गावाच्या सीमेवर चंद्र आणि सूर्य कोरलेला दगड आहे. य दगडावर सूर्य आणि चंद्र उगवतो पहिले किरण पडते. चांद-सूरज गावापलीकडे असलेल्या पर्वत रांगातून पहाटे पूर्वदिशेला गुलाल उधळीत सूर्य डोकावतो आणि सकाळी सुर्योदच्या किरणांनी चांद-सूरज गाव न्हाऊन जातो. त्यानंतर महाराष्ट्रातील सर्व गावांमध्ये सुर्योदत होत असल्याचे बोलल्या जाते.



चांद-सूरज गावाजवळ सीमेवर असलेल्या चंद्र आणि सूर्य देव अंकित असलेला दगड गावकऱ्यांसाठी सर्वात जास्त पूजनीय मानले जाते.

दर पोर्णिमेला चांद सूरज गावातील लोक येथे पूजा करतात व सुख समृद्धीची कामना करतात. वर्षभर जे सण आणि उत्सव साजरे होतात. त्या सणानिमित्त सुद्धा गावकरी या चंद्र आणि सूर्याच्या दगडाला नमन करुन पूजा करतात आणि या ठिकाणावरुनच सूर्य आणि चंद्र देवाचे दर्शन घेत नमन करतात.

### खगोलीय ज्ञानावर विश्वास

**चांद-सूरज हे गाव सालेकसा तालुका मुख्यलापासून जवळपास २२ किलोमीटर अंतरावर असून या गावात आदिवासी मागासलेले लोक असले तरी चंद्र आजण सूर्याला देव माननारे आहे. त्यांना खगोलीत ज्ञान खूप महत्वाचा मानला जातो. म्हणून ते पोर्णिमेला पूर्ण चंद्राचे दर्शन होतात चंद्रदेवाची पूजा करतात आणि सुंदर देव आणि सूर्यदेव कोरीव असलेल्या दगडाची सुद्धा पूजा करतात.**

### तीन राज्यांचे एकत्रित लोक

**सालेकसा तालुका हा तीन राज्यांच्या टोकावर स्थित असून तालुक्यातील सुदूर भागात असलेला मुरकुटडोह या गावाजाळ तिन्ही राज्यांचे एकत्रित टोक केंद्रीत आहे. या टोकावर पश्चिमेकडे तोंड करुन उभे झाल्यास डाव्या बाजूला महाराष्ट्र आणि उजव्या बाजूला मध्यप्रदेश असे बघायला मिळते. या ठिकाणातून सुरु झालेली दोन राज्यांची सीमा पुढे जाताना नंदूरबार जिल्ह्यापर्यंत प्रवास करते. तर याच टोकावरुन दक्षिणेकडे तोंड करून उभे झाल्यास डाव्या बाजूला छत्तीसगड तर उजव्या बाजूला महाराष्ट्र आहे. या दोन्ही राज्याची सीमा गडचिरोली जिल्ह्याच्या भागरागड तालुक्यापर्यंत आहे.**

### याच गावावरुन लागते महाराष्ट्राची सीमा

**१९६० ला महाराष्ट्राच राज्याची निर्मिती होण्यापुर्वी विदर्भ प्रांत हा मध्य प्रांतात समाविष्ट होता. त्यामध्ये विदर्भ आणि छत्तीसगड तसेच मध्य प्रदेशातील महाकौशल या प्रांताचा समावेश होता. १९६० ला जेव्हा महाराष्ट्र राज्याची भाषेच्या आधारावर निर्मिती झाली तेव्हा विदर्भ महाराष्ट्राला जोडला गेला आणि छत्तीसगड मध्यप्रदेशाला जोडला गेला. तेव्हा तालुक्यातील चांदसूरज गावाजवळून छत्तीसगड आणि महाराष्ट्राची सीमा निर्धारित करण्यात आली. तेव्हापासून चांद-सूरज हे गाव महाराष्ट्राच्या पुर्वी टोकावरील पहिले गाव असून या गावावरूनच महाराष्ट्राची सुरुवात होते.**

# स्मार्ट प्रकल्प संचालक दशरथ तांभाळे यांची पालेवाडा येथे भेट

**गोंदिया :** बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प स्मार्टचे संचालक तथा राज्याचे नोडल अधिकारी दशरथ तांभाळे हे नुकतेच गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. या दरम्यान त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी गोंदिया येथे आयोजित बैठकीत स्मार्ट प्रकल्पांतर्गत जिल्ह्यात कार्यरत शेतकरी उत्पादक संस्था, शेतकरी गट व विविध प्रतिनिधींशी संवाद साधून प्रकल्पाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यानंतर गोरेगाव तालुक्यातील ग्राम पालेवाडा येथील शेतकरी चैतराम कटरे यांच्या शेताला भेट देऊन कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या योजनेतून




उभारलेल्या कायमस्वरुपी गांडूळ खत प्रकल्पाची पाहणी केली. आत्मा यंत्रणेमार्फत जिल्ह्यात घेण्यात येत असलेल्या विविध भाजीपाला व तेलबिया पिकांच्या प्रात्याक्षिकांना भेटी दिल्या. यावेळी प्रकल्पाच्या विभागीय नोडल अधिकारी श्रीमती प्रज्ञा गोळघाटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण, मुल्यसाखळी तज्ञ कावेरी साळे, आर्थिक सल्लागार सचिन कुंभार, गोरेगावच्या तालुका कृषी अधिकारी श्रीमती सुलक्षणा पाटोळे तसेच कृषी विभागाचे कर्मचारी, शेतकरी उत्पादक गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, पुरुष व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ...ही तर बोनसच्या नावावर शेतकऱ्यांची थट्टाच !

## धानाला प्रोत्साहान अनुदान म्हणून राज्य सरकारकडून दरवर्षी बोनस जाहीर केले जाते

**गोंदिया:** राज्यात आजपर्यंत धानाला प्रति क्विंटल बोनस जाहीर केला जात होता.पण राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने गुरुवारी हिवाळी अधिवेशनादरम्यान धानाला हेक्टरी १५ हजार रुपये बोनस जाहीर करून हेक्टरी बोनसची नवीन पंरपरा जाहीर केली. केवळ दोन हेक्टरपर्यंतच बोनस दिले जाणार आहे. त्यामुळे प्रति क्विंटल ४१६ रुपये एवढे तुटपुंजे बोनस शेतकऱ्यांना मिळणार असल्याने बोनसच्या नावावर ही चक्क शेतकऱ्यांची थट्टाच असल्याचा सूर आता शेतकऱ्यांमध्ये उमटू लागला आहे.



शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळांतर्गतग शासकीय धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून सन २००९-१० पासून धान खरेदी केली जाते.या केंद्रावर धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना हमीभाव मिळण्याची हमखास खात्री असते. धानाच्या लागवड खर्चात सातत्याने वाढ होत आहे, तर त्यातून उत्पादित होणाऱ्या धानाचे उत्पादन हे दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे सरकारकडून शेतकऱ्यांना मदत म्हणून प्रोत्साहान अनुदानाच्या स्वरुपात प्रति क्विंटल बोनस जाहीर केला जातो.सन २०१५ -१६ पासून धानाला बोनस जाहीर करण्यास सुरुवात झाली.

सुरुवातीला प्रति क्विंटल २०० रुपये, २५० रुपये, ३०० रुपये त्यानंतर ५०० रुपये आणि महाविकास आघाडीचे सरकार असताना सर्वाधिक ७०० रुपये प्रति क्विंटल बोनस जाहीर करण्यात आला होता.यासाठी ५० क्विंटल पर्यंतची मर्यादा निश्चित करण्यात आली होती.यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी ३५ हजार रुपये बोनस स्वरूपात मिळत होते.


पण राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने ही पंरपरा मोडीत काढत हेक्टरी १५ हजार रुपये बोनस जाहीर करून नवीनच पंरपरा रूढ केली. आधीच्या सरकारपेक्षा कमी बोनस आणि त्यातही दोन हेक्टरची मर्यादा घालून दिल्याने या बोनसचा लाभ केवळ मोजक्याच शेतकऱ्यांना होणार आहे.

**प्रति क्विंटल केवळ ४१६ रुपये बोनस**

शिंदे-फडणवीस सरकारने गुरुवारी धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी बोनसची घोषणा केली. हेक्टरी १५ हजार बोनस मिळणार असून,यासाठी २ हेक्टरची मर्यादा घालून दिली आहे.एका एकरात १६ क्विंटल धानाचे उत्पादन होत असून,१ हेक्टरमध्ये ४० ते ४२ क्विंटल धानाचे उत्पादन होते.ते त्यामुळे या नवीन घोषणेनुसार प्रति क्विंटल ४१६ रुपये बोनस शेतकऱ्यांना मिळणार आहे.

**जे छत्तीसगड, मध्य प्रदेशला जमले ते महाराष्ट्राला का नाही?**

लगतच्या छत्तीसगड राज्यात धानाला प्रति क्विंटल २२०० रुपये दर व ४०० रुपये बोनस दिला जातो, तर मध्य प्रदेश सरकारने मागील दोन वर्षांपासून बोनस देण्याऐवजी धानाला सरसकट २५०० रुपये हमीभाव जाहीर केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टीने हितावह ठरत आहे. मग जे मध्य प्रदेश आणि छत्तीसगडला शक्य झाले, ते महाराष्ट्राला का शक्य नाही? असा सवाल शेतकऱ्यांकडून केला जात आहे.



धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी १५ हजार रुपये बोनस देण्याची घोषणा करून एकप्रकारे धान उत्पादक शेतकऱ्यांची दिशाभूल केली आहे.बोनसला दोन हेक्टरपर्यंतची मर्यादा लावली आहे. या निर्णयाचा लाभ केवळ मोजक्याच शेतकऱ्यांना होणार इतर हजारो शेतकऱ्यांवर एक प्रकारे अन्याय करणार हा निर्णय आहे.


-खासदार प्रफुल पटेल

### शिंदे सरकार शेतकरी विरोधी



महाराष्ट्र शासनाने नुकतेच पार पडलेल्या नागपूर हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्रातील धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी १५००० रुपयाप्रमाणे दोन हेक्टरच्या मर्यादेपर्यंत बोनस मिळणार असल्याचे जाहीर केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महाराष्ट्र सरकारला हेक्टरी ४० क्विंटल मर्यादा देऊन प्रती क्विंटल १००० रुपयाप्रमाणे सरसकट बोनस देण्यासंदर्भात मोर्चे काढून मागणीचे निवेदन देऊन केली होती. परंतु शेतकरी विरोधी सरकारने शेतकऱ्यास दोन हेक्टर मर्यादेपर्यंत मात्र हेक्टरी १५ हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शिंदे सरकारने शेतकऱ्यांना निराश केल्याचा आरोप तालुका शेतकरी सल्लागर समितीचे एफ.आर.टी.शहा यांनी केला.

# आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी केंद्रावर आरोग्य मेळाव्यातून होणार तपासणी



**गोंदिया:** आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात एप्रिल महिन्यात ग्रामीण रुग्णालय स्तरावर आरोग्य मिळावे आयोजित करण्यात आले होते. त्यात नागरिकांनी उस्फूर्तपणे सहभाग घेऊन आपल्या आरोग्याची तपासणी केली. याचेच यश म्हणून केंद्र सरकारने मार्गदर्शक पत्राद्वारे प्रत्येक महिन्याच्या १४ तारखेला आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्यवर्धिनी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर आरोग्य मिळावे आयोजित करण्यात येणार असून लोकांनी आपले आरोग्यबाबत जागृत राहून तपासणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे.

दि. २६ डिसेंबर २२ रोजी त्या संबंधाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय समन्वय समितीची सभा जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांचे अध्यक्षेत पार पडली. सभेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कुसुमाकर घोरपडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अमरीश मोहबे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. नितीन कापसे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे, सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. रोशन राऊत , जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अर्चना वानखेडे, जिल्हा आरोग्यवर्धिनि कार्यक्रम कन्सलटंट डॉ. नम्रता दोहाते, जिल्हा आय.ई.सी. अधिकारी प्रशांत खरात , सर्व तालुका आरोग्य अधिकारी, विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी आरोग्यवर्धिनी केंद्रातील आरोग्य मेळावे याबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती करून शिक्षण विभाग, बालविकास विभाग, पंचायत विभाग व आरोग्य विभाग यांनी एकत्रित सहकार्यातून आरोग्य मिळावे ची माहिती गावोगावी लोकांपर्यंत पोहचावी व जास्तीत जास्त लोकांनी तपासणी करुन घेण्याचे आवाहन याप्रसंगी केले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी याप्रसंगी समितीला अवगत केले की दर महिन्याच्या १४ तारखेला आरोग्य मिळावे करताना एक घोषवाक्य राज्य स्तरावर प्राप्त होईल त्यानुसार आरोग्य मिळावे भरले जातील. दि. १४ जानेवारी २०२३ रोजी "किशोरवयीन वयोगटाकरिता विशिष्ट आरोग्य उपक्रम आणि कुष्ठरोग निर्मूलन उपक्रम" या आधारे जास्तीत जास्त किशोरवयीन मुले व मुली यांनी आरोग्य मिळावे मध्ये सहभाग घेवुन आरोग्याची तपासणी करण्याचे आव्हान याप्रसंगी डॉ. नितीन वानखेडे यांनी केले आहे.

हिवताप,क्षयरोग,कुष्ठरोग,िसकलसेल, मधुमेह, रक्तदाब, मानसिक आजार ,दंत व मुखरोग, कर्करोग, डोळ्यांचे विकार, नाक कान व घसांचे आजार,हिपँटायटीस, बालकांमधील आजार, वार्धक्य आजार, स्त्रियांचे आजार,साथरोग, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार , तंबाखु व गुटखा चे आरोग्यावर होणारे अपाय, दारु व्यसनावर होणारे परिणाम, जलजन्य आजार, किटकजन्य आजार,वायु प्रदुषण ई. विविध आजारावर मार्गदर्शन तसेच शासकिय विविध योजना व कार्यक्रमांची माहिती ह्या प्रसंगी लोकांना जागृत करण्यात येणार आहे. योगा प्रात्यक्षिक व त्याचे महत्व, आयुष उपचार पद्धती, विविध वन औषधी याचे पटवुन देण्यात येणार आहे. आरोग्य संस्थेत उपलब्ध प्रयोगशाळा तपासण्या मोफत करण्यात येणार आहे.आरोग्य सेवा,संदर्भसेवा,समुपदेशन,आरोग्य शिक्षण यावर जनजागृती करण्यात येणार आहे.

तरी जास्तीत जास्त लोकांनी आरोग्य मेळाव्यात जागृत राहून आरोग्य तपासणी करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी व जिल्हा आरोग्य प्रशासना तर्फे करण्यात आलेले आहे.

# माजी खासदार आनंदराव अडसुळ यांचा जाहिर निषेध

**गोंदिया:-** राज्य सरकारी मध्यवती संघटनेचे राज्य उपाध्यक्ष आणि चतुर्थ श्रेणी गट ड सरकारी कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांचे वर माजी खासदार आनंदनाव अडसुळ आणि त्यांचे गुंड प्रवृत्तीचे सहकारी यांनी आकाशवाणी आमदार निवासात महाराष्ट्र मंत्रालय क्रेडीट सोसायटीतील कार्यालयास शिरुन त्यांचेवर बेकायदेशी कामे करण्यास दमदाटी केले. आणि त्यांचा गळा दाबुन पाण्याचे बाटलीन मारहाण करुन प्राणघातक हल्ला केला. या घटनेचा तिव्र निषेध नोदवित असून माजी खासदार आनंदराव अडसुळ आणि त्यांचे संबंधित सहकारी यांना तात्काळ अटक करुन कठोर कार्यवाही करण्यात यावी याकरीता राज्य सरकारी मध्यवती संघटनेचे सरचिटणीस लिलाधर पाथोडे यांचे नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करुन निषेध नोंदविण्यात आला.तसेच.उप जिल्हाधिकारी स्मीता बेलपात्रे यांचे मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.



जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष पी.जी. शहारे, सरचिटणीस शैलेश बैस, कोषाध्यक्ष सुभाष खत्री, कार्याध्यक्ष सौरभ अग्रवाल, उपाध्यक्ष कमलेश बिसेन, जिल्हा संघटक संतोष तुरकर, महासंघाच्या महिला उपाध्यक्ष कु. चित्रा ठेंगरी, महिला उप समितीच्या अध्यक्ष तेजश्वीनी चेटुले, रमेश नागपल्लीवार लिपीक संघटनेचे अध्यक्ष संतोष तोमर, कार्याध्यक्ष एन.यु.कावळे, सहसचिव अभिजीत बोपचे, आय.पी.गोमासे चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भगीरथ नेवारे, एन.आर. रामटेके, गुरबेले, आकाश चव्हाण, आशिष भोयर, कटरे, आदी कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## इंजि. राजकुमार बडोले मित्र परिवारातर्फे नवनिर्वाचित सरपंच,सदस्याचा गुरुवारी सत्कार

**सडक अर्जुनी:**इंजि.राजकुमार बडोले मित्र परिवाराच्या वतीने आशिर्वाद सभागृह सडक अर्जुनी येथे ०५ जानेवारी रोजी अर्जुनी-मोर विधानसभा क्षेत्रातील सर्व नवनिर्वाचित सरपंच,सदस्याचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.या सत्कार सोहळ्याचे उद्घाटन भंडारा गोंदियाचे खासदार सुनिल मेंन्ढे यांच्या हस्ते होणार असुन भाजपचे विदर्भ संघटन मंत्री डॉ.उपेंद्र कोठेकर यांच्या अध्यक्षतेत माजी मंत्री डॉ.परिणय फुके,आदर्श संरपच भास्करराव पेरे पाटील,भाजप जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर,प्रदेश उपाध्यक्ष हेमंत पटले,संजय भेंडे,संपर्क प्रमुख विरेंद्र अंजनकर याच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

# शासकीय निवासी शाळेत प्रवेश घेण्यासाठी अर्ज आमंत्रित

**गोंदिया :** सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग विभागाच्या १ जून २००६ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुला-मुलींकरीता शासकीय निवासी शाळा सुरु करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमधील बहुतांश व्यक्ती हया शेतमजूर किंवा लहान सीमांकीत शेतकरी असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्यांना त्यांच्या मुलांना शाळेत पाठवून त्यांचा शैक्षणिक विकास घडवून आणणे अत्यंत कठीण आहे. सदर परिस्थिती लक्षात घेऊन प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी निवासी शाळा सुरु करण्यात आलेली आहे. सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय निवासी शाळा शासनाच्या वतीने सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासकीय निवासी शाळेमध्ये वर्ग ६ वी ते १० वी पर्यंत कार्यरत आहेत.

**लाभाचे स्वरुप-** मोफत शैक्षणिक साहित्य व पाठ्यपुस्तके, अध्यापनासाठी प्रशिक्षीत व अनुभवी शिक्षक वर्ग, मोफत शैक्षणिक साहित्य उपलब्ध व डिजीटल क्लास रुम, लॅग्वेज लॅब, क्रासवर्ड ग्रंथालय, वाचन साहित्यांनी समृध्द ग्रंथालय, प्रयोगसाहित्यांनी सुसज्ज प्रयोगशाळा, संगीत कक्ष, टेलीस्कोप. शाळेमध्ये भव्य क्रीडांगणासहीत क्रीडा साहित्य व ग्रीन जिम. सुसज्ज संगणक कक्ष व इंटरनेट सुविधा, विविध वाद्य साहित्याने समृध्द संगीत कक्ष, मनोरंजन व शैक्षणिक माहितीकरीता रंगीत दुरचित्रवाणी, शालेय गणवेश, नाईट सुटस्, क्रीडा ट्रॅक सुट. मोफत राहण्याची व भोजनाची व्यवस्था ज्यामध्ये उत्कष्ठ भोजन, नास्ता, दुध, अंडी व ऋतुमानानुसार फळे दिली जातात. शुध्द पिण्याचे पाणी, जेवणासाठी डायनिंग टेबलची व्यवस्था. अंथरुण व पांघरुण साहित्य उपलब्ध. मुलींकरीता मोफत दैनंदिन गरजेच्या वस्तु उपलब्ध करुन देण्यात येते. आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येते. प्रशिक्षित सुरक्षारक्षक व सफाई कर्मचारी. सीसीटीव्ही कॅमेऱ्यानी सुसज्ज निवासी शाळेतील इमारत. निवासी शाळेमध्ये सर्वप्रकारची पुस्तके तसेच ५ वर्तमानपत्रे व १० शिक्षण उपयोगी मासिके त्यामध्ये सामान्य ज्ञान, स्पर्धा परीक्षा, मार्गदर्शन चालु घडामोडी बाबत अंक इंग्रजी व मराठी दोन्ही भाषेतील. वर्षातून दोनदा पालक सभेचे आयोजन. वर्षातून एकदा स्नेह सम्मेलनाचे आयोजन.

**आवश्यक कागदपत्रे-** अर्ज, महाराष्ट्राचा रहिवाशी असल्याचा दाखला, शाळेतील प्रवेशाबाबतचे बोनाफाईड, शाळा सोडल्याचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, विद्यार्थ्यांस सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र, मागील वर्षाची गुणपत्रिका, आधार कार्ड (झेरॉक्स), फोटो- ६ प्रती.

अधिक माहितीसाठी संबंधीत शासकीय निवासी शाळेतील मुख्याध्यापक तसेच सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय गोंदिया यांचेशी संपर्क साधावा. असे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण गोंदिया यांनी कळविले आहे.

# नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला ४ विदेशी पाहुण्यांची भेट

**गोंदिया:** जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाची ख्याती आता दुरवर पसरत आहे. हेच कारण आहे की, मोठ्या संख्येत पर्यटक निसर्ग सनिध्यात आपली वेळ घालविण्यासाठी आता व्याघ्र प्रकल्पाची धाव घेतात. त्यातच आनंदाची बाब म्हणजे या वर्षात ४ विदेशी पर्यटकांनी व्याघ्र प्रकल्पाला भेट दिली आहे. कोरोनानंतर आता विदेशी पर्यटक पुन्हा एकदा प्रकल्पात येऊ लागल्याचे दिसत आहे. विदेशी पर्यटकांना आता नवेगाव-नाागझिरा व्याघ्र प्रकल्प भुरळ घालत आहे. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

मानूस आपल्या हव्यासपोटी जंगलांना नष्ट करुन तेथेही सिंमेट क्रॉकीटचे जंगल उभारत आहे. परिणामी आज मोकळा श्वास घेण्यासाठी या मानवाला नैसर्गिक वातावरण उरलेले नाही. यामुळेच या धकाधकीच्या जीवनात काही कळ निवांत घालविण्यासाठी निसर्ग सानिध्याची गरज भासत आहे. यासाठी वन विभागाने राखून ठेवलेल्या जंगलाकडे त्यांची पावले आपसूकच वळत आहेत. हेच कारण आहे की, शहरी नागरिकांचा कल आता वन पर्यटनाकडे दिसत आहे.

अशात जिल्हावासीयांसाठी नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प वरदन ठरत असून येथे नेहमीच पर्यटकांची गर्दी असते. व्याघ्र प्रकल्पात देशातील दुरवरुन पर्यटक भेट देत आहेत. मात्र आता विदेशातही नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाची ख्याती पसरली आहे.

यामुळेच आता विदेशी पाहुण्यांचे पायही येथील व्याघ्र प्रकल्पाकडे वळत आहेत. या वर्षात नोव्हेंबरपर्यंत ४ विदेशी पर्यटकांनी नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला भेट दिली. विशेष म्हणजे सन २०२०-२१ व २०२१-२२ या कालावधीत म्हणजेच कोरोनाकाळात एकही विदेशी पर्यटक पर्यटनासाठी आला नव्हता.

मात्र आया या ४ विदेशी पर्यटकांच्या आगमनानंतर आता विदेशी पर्यटकांचे आगमन होणार असे शुभसंकेत यातून मिळत आहेत.

**कोरोनाचे दोन वर्षे सर्वात भकास**

सन २०१९ मध्ये कोरोनाने देशात प्रवेश केला व त्यानंतर दोन वर्षे कोरोनामुये सर्वच काही विस्कळून गेले होते. या काळात व्याघ्र प्रकल्पही कित्येक महिने पर्यटनासाठी बंद ठेवावा लागला होता. आता कुठे परिस्थिती नियंत्रणात आली असून सर्व काही सुरळीत होताना दिसत आहे. मात्र कोरोनामुळे व्याघ्र देशातील पर्यटकांनी संख्या घटल्याचे दिसत असतानाच सन २०२०-२१ व २०२१-२२ या काळात एकही विदेशी पर्यटक व्याघ्र प्रकल्पात आला नव्हता.

**वन विभागाला ४१ लाखांचे उत्पन्न**

या वर्षात नोव्हेंबपर्यंची माहिती जाणून घेतली असता १९,७६९ पर्यटकांनी तसेच ४ विदेशी पर्यटकांनी व्याघ्र प्रकल्पाला भेट दिली आहे. यातून वन विभागाला ४१,२३,४८५ रुपयांचे उत्पन्न झाले आहे. पर्यटनातून पैसे कमविण्याचा वन विभागाचा काहीच हेतू नसतो. फक्त पर्यटकांना निसर्ग व वन्यजीवांची विविधता व त्यांचे महत्व कळावे या हेतूने वन विभागाकडून पर्यटनाला परवानगी देण्यात आली आहे. मात्र यातून ४१ लाख रुपयांचे उत्पन्न हे सुद्धा तेवढेच महत्व ठेवते.

**सन २०१९-२० मध्ये आले होते ९६ विदेशी पर्यटक**

येथील नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाची दुरवर ख्याती आहे. यात काही शंका नाही. यामुळेच विदेशी पाहुणेही आता व्याघ्र प्रकल्पात वाघोबाच्या दर्शनासाठी येत आहेत. अशात सद २०१५-१६ पासूनच रेकार्ड बघितल्यास सन २०१९-२० मध्ये सर्वाधिक ९६ पर्यटकांनी व्याघ्र प्रकल्पाला भेट दिल्याचे दिसून येते. त्यानंतर सन २०१६ ते २०१९ चा काळही चांगलाच राहिला. आता ६ पर्यटकांनी भेट दिल्याचे दिसून असून पुन्हा एकद विदेशी पाहुण्यांची संख्या वाढणार यात शंका वाटत नाही.



**स्पेनच्या दोघा पाहुण्यांची भेट**

डिसेंबर महिन्यात ८ तारखेला व्याघ्र प्रकल्पाला स्पेन येथील ओडीओल कॅनाल व अन्य एक अशा दोघा विदेशी पाहुण्यांनी भेट दिली. त्यांनी ८ तारखेला खोली गेटवरुन तर ९ तारखेला मंगेझरीवरुन व्याघ्र प्रकल्पात प्रवेश करुन पर्यटन केले.

# प्रशासकीय सेवेत कर्तव्यनिष्ठेला सर्वोच्च प्राधान्य द्या-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे

## आरोग्य व रक्तदान शिबीर आयोजित,अनाथ मुलांना शालेय साहित्य वाटप,महसूल विभागाचा उपक्रम

**गोंदिया :** शासन ही लोककल्याणकारी संस्था असून प्रशासकीय अधिकारी हा लोकसेवक आहे. आपली भूमिका ही लोकांच्या हिताची व कल्याणाची असावी. आपल्याकडे येणाऱ्या नागरिकांना वेळेत सेवा पुरविणे आपले कर्तव्य आहे. नव्हे ते आपले सामाजिक दायित्वच आहे. शासकीय सेवा प्रदान करतांना कर्तव्यनिष्ठेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले. जिल्हा प्रशासन व महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना गोंदिया जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नववर्ष स्वागत, आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीर कार्यक्रमात ते बोलत होते.



मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले, जिल्हा सूचना अधिकारी गजभिये, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी धनंजय देशमुख, जिल्हा प्रशासन अधिकारी करणकुमार चव्हाण यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

नववर्ष स्वागताच्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयात अनाथ मुलांना शालेय साहित्य वाटप, कोविड मध्ये ज्यांचे पती मृत्यू पावले अशा महिलांना अन्न धान्य किट वाटप, महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना महसूल संबंधी पुस्तक वाटप, नियोजन विभाग यांना आस्थापना व माहिती अधिकार पुस्तक वाटप व पुरवठा विभाग यांना आस्थापना बाबत पुस्तक वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नवं वर्षाचे अशा अभिनव पद्धतीने व लोकोपयोगी उपक्रमाने स्वागत करण्यात आले. अधिकारी कर्मचाऱ्यांची संपूर्ण आरोग्य तपासणी, वृक्षारोपण व पोस्टामार्फत विमा सुरक्षा पॉलिसी असा हा उपक्रम जिल्हा प्रशासन व महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना गोंदिया जिल्हा यांनी आयोजित केला होता.

आरोग्य तपासणी, पुस्तक वाटप व विमा सुरक्षा कवच या अभिनव उपक्रमाने नवीन वर्षाचे स्वागत ही संकल्पना प्रशंसनीय असल्याचे सांगून जिल्हाधिकारी म्हणाले की, शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्य व आर्थिक सुरक्षेसाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. शासनात काम करतांना सातत्याने नव्या बदलांना सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेता नियम, कायदे, शासन निर्णय यांचा अभ्यास करावा. त्याआधारे सामान्य माणसाला न्याय मिळवून द्यावा. प्रत्येकाने आपल्या कामाप्रती प्रामाणिक राहून लोकसेवा केल्यास लोककल्याणकारी शासन प्रशासन हा संदेश लोकांपर्यंत पोहचेल व शासनाची प्रतिमा उंचावेल असे ते म्हणाले.

सामान्य नागरिकांचे आपल्याकडे असलेले काम वेळेत पूर्ण करणे म्हणजेच सुशासन असे सांगून मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील म्हणाले की, आपण लोकसेवक आहोत लोकांना विहित वेळेत सेवा देणे आपले कर्तव्य आहे. शासकीय कामकाजासाठी आपल्याकडे येणाऱ्या लोकांचे म्हणणे ऐकून घ्या, त्यांना प्रतिसाद द्या व त्यांनी कामे प्राधान्याने करा असा सल्ला त्यांनी दिला. नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने लोकांची कामे वेळेत पूर्ण करण्याचा संकल्प करा असे आवाहन श्री. पाटील यांनी केले. दप्तरमुक्त शाळा व एक दिवस शाळेसाठी या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या कामाची माहिती शालेय विद्यार्थ्यांना द्या तसेच त्यांच्या शासनाकडून काय अपेक्षा आहेत ते जाणून घ्या असे त्यांनी सांगितले.

शालेय साहित्य वाटप, आरोग्य तपासणी व विमा कवच या उपक्रमात अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. अनेकांनी आरोग्य तपासणी केली व पोस्टची ३९९ रुपयांची विमा पॉलिसी सुद्धा घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चोबे यांनी केले तर उपस्थितांचे आभार संतोष शेंडे यांनी मानले. या कार्यक्रमास अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाकरीता महसुल संघटनेचे जिल्हाध्यक्ष आशिष प्र. रामटेके,सचिव राकेश डोंगरे,जितेंद्र घासले,नीलकंठ कावळे,श्री गुरुभेले आदींनी विशेष परिश्रम घेतले.





## खादी ग्रामोद्योग भंडार अध्यक्षपदी जायस्वाल व सचिवपदी पटले

**गोंदिया :** भंडारा जिल्हा सहाय्यक समिती गोंदिया खादी ग्रामोद्योग भंडार यांची कार्यकारीणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. समितीच्या अध्यक्षपदी प्रेम जायस्वाल तर सचिवपदी राजकुमार (पप्पु) पटले यांची निवड करण्यात आली आहे.

खादी ग्रामोद्योग भंडार अंतर्गत विविध वस्तूची विक्री केली जाते. याशिवाय विविध उपक्रमही राबविण्यात येतात. कार्यकारीणीचे नुकतेच गठन करण्यात आले असून अध्यक्षपदी प्रेम जयस्वाल, उपाध्यक्षपदी महेश गोयल, सचिवपदी राजकुमार पटले, सहसचिवपदी आशिष अग्रवाल तर सदस्यपदी अनिल शहारे, कुवरलाल वैद्य, उषा गुप्ता यांचीनिवड करण्यात आली आहे. नवनियुक्त कार्यकारीणीचे शहरातील अनेक गणमान्य नागरीकांनी अभिनंदन केले आहे.

## जुन्या पेंशनकरीता मुख्यंत्र्यांना कर्मचारी संघटनेचे निवेदन

**गोंदियाः-** महाराष्ट्रातील कर्मचारी ज्यांना २००५ नंतर जुनी पेन्शन योजना बंद करून एनपीएस योजना लागू करण्यात आली. परंतु बेभरोसा आणि वाऱ्यावर असणारे पैश्याची भीती महाराष्ट्रातील लाखो कर्मचाऱ्यांना असल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व कर्मचारी एनपीएसला विरोध करत असल्यामुळे वसंतराव नाईक अधिकारी कर्मचारी संघटनेच्या गोंदिया वतीने जिल्हाधिकारी मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जुनी पेन्शन लागू करण्यासाठी निवेदन पाठवण्यात आले.

कर्मचाऱ्यांना विश्वासात न घेता अतिशय वाईट अशा प्रकारची एनपीएस योजना कर्मचाऱ्यांच्या माथी मारून दिल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मनात या योजने विरुद्ध अतिशय आक्रोश असल्याचे दिसून येत आहे.अशा वाईट योजनेमध्ये शासन व कर्मचारी या दोघांचेही नुकसान असल्यामुळे वसंतराव नाईक अधिकारी कर्मचारी संघटनेने निवेदना मार्फत त्वरित एन पी एस योजना बंद करून जुनी पेन्शन योजना लागू करावी याची मागणी निवेदनामार्फत केली आहे. २००५ नंतरच्या सर्व विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी लवकरात लवकर जुनी पेन्शन योजना लागू करावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. याप्रसंगी संघटनेचे महेश राठोड (अध्यक्ष,) प्रदीप राठोड (सचिव), विलास राठोड, संजय राठोड,किशोर राठोड,आकाश चव्हाण अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

